**गोपनीय**

क्र.मुंमप्रविप्रा/बैठक/१२५

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.

दिनांक : २५ ऑगस्ट, २००९.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक ३ ऑगस्ट, २००९ (सोमवार) रोजी झालेल्या १२५ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत काही हरकती असल्यास कृपया कळवाव्यात ही विनंती.

प्रसिद्ध
**सचिव,** २५-८-२००९
**कार्यकारी समिती**

प्रति,

सर्व सदस्य व निमंत्रित

**प्रत अग्रेषित :-**

विधि सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्रा.

प्राधिकरणाचे अधिकारी

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १२५ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक** : ३ ऑगस्ट, २००९ (सोमवार)

**वेळ** : दुपारी ३.३० वाजता

**सभास्थान** : समिती कक्ष, सिकॉम कार्यालय,
निर्मल भवन, पहिला मजला,
नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री.अशोक चव्हाण<br>मा.मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री.हसन मुश्रीफ<br>नगर विकास राज्यमंत्री | सदस्य |
| श्री.वसंत डावखरे<br>उपसभापती, विधानपरिषद | सदस्य |
| श्री.रविंद्र वायकर<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.सुनिल प्रभू<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.आशिष शेलार<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| डॉ.ज.मो.फाटक<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री.सिताराम कुंटे<br>सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |

..२/-

| | |
|---|---|
| श्री.जी.एस.गील<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | सदस्य |
| श्री.रत्नाकर गायकवाड<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

**<u>निमंत्रित :</u>**

श्री.जावेद दळवी
महापौर,
भिवंडी-निजामपूर महानगरपालिका

श्रीमती विद्या निर्मळे
महापौर,
उल्हासनगर महानगरपालिका

श्री.सुनिल मोहोड
नगराध्यक्ष,
पनवेल नगरपरिषद

श्री.नंदकिशोर पातकर
नगराध्यक्ष,
कुळगांव-बदलापूर नगरपरिषद

श्रीमती रेखा पष्टे
अध्यक्षा,
ठाणे जिल्हा परिषद

ॲड. (श्रीमती) निलिमा पाटील
अध्यक्षा,
रायगड जिल्हा परिषद

श्री.मनुकुमार श्रीवास्तव
सचिव, नगर विकास विभाग व
सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग (अति.कार्यभार),
महाराष्ट्र शासन

बैठकीच्या सुरुवातीस मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी श्री.हसन मुश्रीफ, नगर विकास राज्यमंत्री यांचे प्राधिकरणाचे "पदसिध्द सदस्य" म्हणून व श्री.सुनिल मोहोड, नगराध्यक्ष, पनवेल नगरपरिषद यांचे पदसिध्द "स्थायी निमंत्रित" म्हणून प्राधिकरणाच्या बैठकीस प्रथमच उपस्थित रहात असल्याने त्यांचे स्वागत केले. तसेच, श्री.नारायण मानकर, माजी नगराध्यक्ष, भूतपूर्व

..३/-

नवघर-माणिकपूर नगरपरिषद आणि श्री.प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष, पनवेल नगरपरिषद यांनी प्राधिकरणाचे "स्थायी निमंत्रित" म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचा गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषयपत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : दिनांक १० फेब्रुवारी, २००९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१२४ व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ कार्यवृत्ताच्या संदर्भात खालीलप्रमाणे चर्चा झाली –

(१) प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, दिनांक १० फेब्रुवारी, २००९ नंतर प्राधिकरणाची बैठक घेण्यात आलेली नाही. या दोन बैठकींच्या दरम्यान सहा महिन्यांचा कालावधी झालेला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम ५(१) नुसार निदान ३ महिन्यातून एकदा बैठक घेणे आवश्यक आहे. याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, लोकसभा निवडणूका असल्यामुळे आणि विधानसभेचे अधिवेशन सुरु असल्यामुळे प्राधिकरणाची बैठक आयोजित करणे शक्य झाले नाही. यानंतरची प्राधिकरणाची बैठक नियमितपणे आयोजित करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(२) कार्यवृत्तावर चर्चा करताना श्री.रविंद्र वायकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी विक्रान्त आयएमएस याबाबत चर्चा उपस्थित केली. श्री.मनुकुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग यांनी याबाबत असे सांगितले की, खाजगी विकासकातर्फे उभारण्याचे प्रस्तावित असलेल्या या IMS Vikrant प्रकल्पाचा अपेक्षित खर्च सुमारे रु.३०० कोटीच्या वर असेल. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाच्या सहभागानुसार पूर्वी अंदाजित केलेल्या खर्चापैकी भारत सरकारने दिलेल्या रु.४२ कोटीपैकी रु.१२ कोटी खर्च करण्यास मंजूरी दिलेली आहे. MUINFRA तर्फे सदर प्रकल्प उभारण्यासाठी मागविलेल्या निविदेनुसार प्राप्त निविदांतून ५ निविदाकारांची संक्षिप्त सूची तयार करण्यात आली असून पुढील २ महिन्यांमध्ये विकासकाची निश्चिती करण्यात येईल.

(३) श्री.रविंद्र वायकर, अध्यक्ष, स्थायी समिती, यांनी बाब क्र.४ मधील योजना क्र.१२ - मिठी नदी विकास खोलीकरण, रुंदीकरण व संरक्षण भिंत बांधणे याबाबत असे प्रतिपादन केले की, सी.एस.टी मार्गापासून माहिम पूलापर्यंत प्रस्तावित रुंदीकरण व खोलीकरण करण्यासाठी आमदारांचा विरोध आहे. त्याबाबत योग्य तो निर्णय घेऊन काम करणे आवश्यक आहे.

श्री.मनुकुमार श्रीवास्तव, सचिव, नगर विकास विभाग यांनी याबाबत असे सांगितले की, जेएनएनयुआरएम अंतर्गत केंद्र शासनाकडून १०० मीटरच्या खोलीकरण व रुंदीकरणाच्या कामासाठी पैसा मिळेल. त्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे.

(४) बाब क्र.६ बाबत प्राधिकरणाचे सदस्य श्री.सुनिल प्रभू, नगरसेवक यांनी असे सांगितले की, त्यांनी मालाड येथे स्कायवॉक बांधण्याबाबतचा प्रस्ताव मांडला होता. त्यांनी असे सांगितले की, याबाबत प्राधिकरणाकडून काही पहाणी झाली नसून सर्व्हे सुध्दा झालेला नाही. महानगर आयुक्तांनी याबाबत असे सांगितले की, प्राधिकरणाकडून ५१ स्कायवॉक पूर्ण होत आहेत. यापुढील ५० स्कायवॉक बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधण्याची तयारी अतिरिक्त आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिकेने दर्शविली होती. यावर आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, पादचारी वरपूल बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून बांधण्यात येतात व स्कायवॉकचे काम प्राधिकरणानेच करावे. याबाबत दोन्ही आयुक्तांनी विचारविनिमय करुन निर्णय घ्यावा असे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिलेत.

प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी पुढे असा मुद्दा उपस्थित केला की, मध्य द्रुतगती मार्गामुळे बरीचशी कामे बाधित होत आहेत. मध्य द्रुतगती मार्ग रद्द करण्यास प्राधिकरणाची संमती आहे. त्यावर महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, हा जुना प्रस्तावित मार्ग असून तो रद्दबादल करण्याची प्रक्रिया सार्वजनिक बांधकाम विभागाने करणे अपेक्षित आहे.

१.२ त्यानंतर, कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**<u>बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या १० फेब्रुवारी, २००९ रोजी झालेल्या १२४व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.</u>**

कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**<u>बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील उपलब्ध बांधकाम क्षेत्र अधिमूल्य आकारुन भूखंडधारकांना वाटप करणेबाबत.</u>**

३.१ या प्रस्तावाबाबत महानगर आयुक्तांनी थोडक्यात माहिती देताना असे सांगितले की, शासनाने वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील विकसनापैकी वाणिज्य क्षेत्रासाठी चटई क्षेत्र निर्देशांक ४ इतका तसेच निवासी क्षेत्राकरिता चटई क्षेत्र निर्देशांक ३ इतका वाढविला आहे. या चटई क्षेत्र निर्देशांक वाढीमुळे अतिरिक्त बांधकाम क्षेत्र मोठया प्रमाणावर वापरासाठी उपलब्ध आहे. परंतु वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये वाटप करण्यायोग्य जमीन कमी शिल्लक आहे. प्राधिकरणाच्या यासंबंधातील ठराव क्र.११९५ नुसार पारीत अतिरिक्त बांधकाम क्षेत्राचे धोरणानुसार रेडी रेकनरच्या १५०% दराने वाणिज्य वापरासाठी व १००% दराने निवासी वापरासाठी अतिरिक्त बांधकाम क्षेत्राचे वाटप करता येते. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले

की, जे खरेदीदार अतिरिक्त बांधकाम क्षेत्र खरेदी करु इच्छितात त्यांनी दिनांक ३१ मार्च, २००९ पर्यंत अधिमूल्याची पूर्ण रक्कम भरणे आवश्यक होते किंवा त्या मुदतीत मागणीकर्त्यांनी मागणी पत्रासोबत अधिमूल्याच्या २०% इतकी रक्कम प्रथम व उर्वरीत रक्कम समान ४ वार्षिक हप्त्यात १०% सरळव्याजाने पुढील ४ वर्षात भरणे आवश्यक होते व हप्ता भरण्यास विलंब झाल्यास देय रकमेवर १८% दराने दंडनीय व्याज आकारण्यात येणार आहे. त्यानंतर, त्यांनी पुढे असे सांगितले की, एकूण ११ मागणीकर्त्यांनी अतिरिक्त बांधकाम क्षेत्र वाटपासाठी दिनांक ३१ मार्च, २००९ पूर्वी अर्ज केले होते. हया सर्व मागणीनुसार एकूण अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या वाटपातून रु.११०८ कोटी इतके अधिमूल्य येणे अपेक्षित होते. या मागणीकर्त्यांपैकी स्टारलाईट सिस्टीम्स् प्रा.लि., आय.एन.जी. वैश्य बँक आणि ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स यांनी अतिरिक्त बांधकाम क्षेत्र वाटपापोटी रु.६३ कोटी भरलेले आहेत. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सध्या जागतिक मंदी सुरु असल्यामुळे ब-याच मागणीकर्त्यांनी सदर अतिरिक्त बांधकाम क्षेत्रासाठी अधिमूल्याची रक्कम भरण्यास मुदतवाढ मिळावी अशी विनंती केली आहे. त्यानुसार सदर धोरणास दिनांक ३१ मार्च, २०१० पर्यंत मुदतवाढ देणे प्रस्तावित आहे. तसेच त्यांनी पुढे असे सांगितले की, निविदेतील तरतूदीनुसार बांधकाम क्षेत्रापैकी ४०% इतके बांधकाम क्षेत्राचे पहिल्या ५ वर्षात हस्तांतरण करता येते व उर्वरीत ६०% क्षेत्राचे त्यानंतर हस्तांतरण करता येते. अतिरिक्त बांधकाम क्षेत्र विकत घेतल्यास त्याचे पूर्ण हस्तांतरण करण्यास मुभा द्यावी अशी विनंती भूखंडधारकाकडून प्राप्त झाली आहे. सध्याच्या जागतिक मंदीच्या काळाचा विचार करता या विनंतीचा विचार करणे योग्य ठरेल. श्री.वसंत डावखरे, उपसभापती, विधानपरिषद यांनी असे प्रतिपादन केले की, आपली ही संस्था विकासाभिमुख आहे. मा.मुख्यमंत्री यांनी असे सांगितले की सध्याच्या जागतिक मंदीच्या काळाचा विचार करता या मुदतवाढीच्या विनंतीचा विचार करणे योग्य ठरेल. मुदतवाढीच्या या प्रस्तावामुळे प्राधिकरणास हाती घेतलेल्या विकास कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध होईल. प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी असे सांगितले की, हा प्रस्ताव अगदी योग्य आहे. श्री.शेलार यांनी असेही सांगितले की, जे वाटपग्रही अधिमूल्याचे हप्ते वेळेवर भरणार नाहीत त्यास आकारावयाचे दंडनीय १८% व्याज हे जास्त आहे. यावर अधिमूल्याची आकारणी करताना अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या मंजूरीच्यावेळी प्रचलित रेडी रेकनर दराने आकारणी करण्यात यावी आणि त्यानंतरच्या वर्षासाठी प्रचलित रेडी रेकनर दर जो उच्च असेल तो आकारण्यात यावा. या संदर्भात मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सांगितले की, जे वाटपग्रही अधिमूल्याचे हप्ते वेळेवर भरणार नाहीत त्यांच्याकडून १८% दंडनीय व्याजाऐवजी स्टेट बँक ऑफ इंडियाचा Prime

Lending Rate (PLR) आकारण्यात यावा. त्याचप्रमाणे या प्रस्तावानुसार मार्च २०१० पर्यंत अतिरिक्त बांधकाम क्षेत्राच्या मागणीकर्त्यांनी मागणी करुन अधिमूल्याची पूर्ण अथवा प्रथम हप्त्याची २०% इतकी रक्कम भरणे आवश्यक राहील. तसेच आकारावयाच्या अधिमूल्याचा दर हा सध्या लागू शिघ्र गणकाच्या (Ready reckner) आधारे असावा व पुढील वर्षी लागू अधिमूल्याचा दर हा त्यावेळचा शिघ्र गणकाचा दर किंवा आताचा दर यापैकी उच्चतर दराच्या आधारे असावा.

३.२ त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२०५ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे ठराव क्र.११९५ मधील अट क्र.२, ३ व ४ मध्ये सुधारणा करुन खालील सुधारीत अटींसह व ठरावातील इतर अटी व शर्ती न बदलता अतिरिक्त बांधकाम क्षेत्र वाटप करण्यास व त्याबाबतच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे.

ठराव क्र.११९५ मधील अट क्र.२ ही रद्द करण्यात येत आहे व त्याजागी पुढील सुधारीत अट राहील.

<u>सुधारीत अट क्र.२</u>

(२) मागणीकर्त्यास अतिरिक्त बांधकाम क्षेत्रासाठी प्राधिकरणाने ठरविलेल्या दराने अधिमूल्याची पूर्ण रक्कम दिनांक ३१ मार्च, २०१० पूर्वी भरणे आवश्यक राहील. अधिमूल्याचा दर हा लागू शिघ्र गणकाच्या (Ready reckner) आधारे असेल. पुढील वर्षाचा अधिमूल्याचा दर हा त्या वर्षीचा शिघ्र गणकाचा दर किंवा सन २००९ चा दर यापैकी उच्चतर दराच्या आधारे असेल.

ठराव क्र.११९५ मधील अट क्र.३ ही रद्द करण्यात येत आहे व त्याजागी पुढील सुधारीत अट राहील .

..७/

<u>सुधारीत अट क्र.३</u>

(३) पर्यायाने मागणीकर्त्याने मागणी पत्रासोबत अधिमूल्याच्या २०% रक्कम (पहिला हप्ता) दिनांक ३१ मार्च, २०१० पूर्वी भरावी व उर्वरित रक्कम समान ४ वार्षिक हप्त्यासह १०% सरळव्याजाने भरावी. वार्षिक हप्ता भरण्यास विलंब झाल्यास देय रकमेवर दंडनीय व्याज हा स्टेट बँक ऑफ इंडियाने ठरविल्याप्रमाणे लागू असलेल्या P.L.R. (Prime Lending Rate) इतका राहील.

ठराव क्र.११९५ मधील अट क्र.४ ही रद्द करण्यात येत आहे व त्याजागी पुढील सुधारीत अट राहील

<u>सुधारीत अट क्र.४</u>

(४) वाटप झालेले अतिरिक्त क्षेत्र वापरण्यासाठी कालावधीचे बंधन नाही, तसेच विकत घेतलेले अतिरिक्त बांधकाम क्षेत्र पूर्णपणे हस्तांतरण करण्यास मुभा राहील.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** भूखंडधारक आयएनजी वैश्य बँक लि. व रघुलीला लिझिंग अँड रियल इस्टेट प्रा.लि. यांना त्यांच्या मागणीनुसार अतिरिक्त बांधकाम क्षेत्र वाटपाबाबत देकारपत्र देण्याच्या कार्यवाहीस प्राधिकरण कार्योत्तर मान्यता देत आहे तसेच त्या अनुषंगाने महानगर आयुक्तांनी करावयाचा भाडेपट्टा करार करणे इत्यादी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.४</u> : <u>महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ या संस्थेस वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये सुमारे १५०० चौ.मी. बांधीव क्षेत्र वाटप करण्याबाबत</u>**

४.१ महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती देताना असे सांगितले की, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला सीआर-२ भूखंडाच्या क्षेत्रापैकी सुमारे १००० चौ.मीटर क्षेत्र त्यांची वाहने उभी करण्याकरीता तात्पुरत्या स्वरुपात अनुज्ञप्ती तत्वावर शासनाने दिले होते. हा भूखंड विकसनासाठी प्राधिकरणास देताना शासनाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ यांच्याकडून भूखंडाचा ताबा काढून प्राधिकरणास मोकळा भूखंड दिला होता. वांद्रे-कुर्ला संकुलामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे मेरीटाईम बोर्डाच्या इमारतीच्या बांधकामाचा खर्च करीत आहेत. त्याच्या मोबदल्यात मेरीटाईम बोर्ड हे प्रस्तावित इमारतीतील ११९२४.७२ चौ.मी. बांधकाम क्षेत्रापैकी प्राधिकरणास ५४७४.७२ चौ.मी. बांधीव क्षेत्र तळधर, प्रमाणशीर अनुषंगीक बाबींसह (अधिमूल्य न आकारता) उपलब्ध करुन देणार आहेत. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने १५०० चौ.मी. बांधकाम क्षेत्र सवलतीच्या दराने अधिमूल्य आकारुन त्यांना वाटप करण्याची विनंती केलेली आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, "जी" ब्लॉकमधील विकसनातून भूखंड वाटप करताना केंद्रीय अन्वेषण विभाग (CBI) या संस्थेला लागू केलेल्या रु.१,५३,०५४/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या अधिमूल्याच्या दराने अधिमूल्य आकारुन, वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना वाटप केलेल्या

..८/-

भूखंड क्र.सी-४७ वरील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व प्राधिकरण मिळून एकत्रितरित्या विकसित करण्यात येणा-या प्रस्तावित इमारतीतील प्राधिकरणास प्राप्त होणा-या ५४७४.७२ चौ.मी. बांधीव क्षेत्रापैकी सुमारे १५०० चौ.मी. एवढे बांधकाम क्षेत्र; तसेच अधिमूल्याव्यतिरिक्त १५०० चौ.मी. बांधकाम क्षेत्र व त्यासाठी लागणा-या १३ वाहनांच्या पार्किंगच्या क्षेत्रासाठी (तळघरातील सुमारे ३२५ चौ.मी.) रु.३०,०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने बांधकाम खर्च आकारुन व यासह रु.१/- प्रति चौ.मी. प्रति महिना या दराने नाममात्र भाडे आकारुन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) या संस्थेस त्यांच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयाकरीता ८० वर्षाच्या भाडेपट्टयाने, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांनी मालमत्ता कर, परिरक्षा शुल्क तसेच इतर खर्च त्यांस वाटप करावयाच्या बांधकाम क्षेत्राच्या प्रमाणात भरण्यासापेक्ष वाटप करण्याच्या प्रस्तावाचा प्राधिकरणाने विचार करावा.

४.२ त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२०६ :</u>

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे पोटकलम (२) तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ नुसार प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, हे प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांना वाटप केलेल्या भूखंड क्र.सी-४७ वरील महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व प्राधिकरण मिळून एकत्रितरित्या विकसित करण्यात येणा-या प्रस्तावित इमारतीतील प्राधिकरणास प्राप्त होणा-या ५४७४.७२ चौ.मी. बांधीव क्षेत्रापैकी सुमारे १५०० चौ.मी. एवढे बांधकाम क्षेत्र रु.१,५३,०५४/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने अधिमूल्य आकारुन, तसेच अधिमूल्याव्यतिरिक्त १५०० चौ.मी. बांधकाम क्षेत्र व त्यासाठी लागणा-या १३ वाहनांच्या पार्किंगच्या जागेसाठी (तळघरातील सुमारे ३२५ चौ.मी.) रु.३०,०००/- प्रति चौ.मी. बांधकाम क्षेत्र या दराने बांधकाम खर्च आकारुन व यासह रु.१/- प्रति चौ.मी. प्रति महिना व वार्षिक १०% चक्रवाढ या दराने नाममात्र भाडे आकारुन महाराष्ट्र

पर्यटन विकास महामंडळ (MTDC) या संस्थेस त्यांच्या मुंबई प्रादेशिक कार्यालयाकरीता ८० वर्षांच्या भाडेपट्टयाने महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) यांनी मालमत्ता कर, परिरक्षा शुल्क तसेच इतर खर्च त्यांना वाटप करण्यात येणा-या बांधकाम क्षेत्राच्या प्रमाणात भरण्यासापेक्ष तसेच नेहमीच्या इतर अटी व शर्तींसह वाटप करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** उक्त विनियमाच्या प्रपत्र "ड" (भाडेपट्टा विलेखाचा नमुना) मध्ये योग्य ते बदल करुन याबाबतीत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (MTDC) या संस्थेबरोबर करार करण्यास व त्या अनुषंगाने पुढील सर्व आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी" ब्लॉकमधील सी-८ वाणिज्य आणि आर १.१ व आर १.४ हे २ रहिवाशी वापराचे भूखंड भाडेपट्टयाने वाटप करण्याबाबत.**

**५.१** महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत असे सांगितले की, सदरहू प्रस्ताव हा "जी" ब्लॉक मधील सी-८ वाणिज्य आणि आर १.१ व आर १.४ हे २ रहिवाशी वापराचे भूखंडाशी संबंधीत आहे. निविदेद्वारे प्राप्त सर्वोच्च निविदा स्विकारुन प्राधिकरणाने भूखंड वाटप करण्यास मान्यता दिल्याप्रमाणे सदर भूखंड वाटपाचा देकार दिला होता. त्यानुसार प्राधिकरणास रु.१३२३ कोटी इतके अधिमूल्य एकूण ३ महिन्यात मिळणे अपेक्षित होते. जागतिक मंदीमुळे रक्कम भरण्यास मुदतवाढ मिळावी या निविदाकारांच्या विनंतीचा विचार करुन प्राधिकरणाने दिनांक ३० मार्च, २००९ पर्यंत मुदतवाढ दिली होती. तथापि, अजूनही वित्तीय परिस्थितीत सुधारणा न झाल्याने या निविदाकारांनी सदरहू अधिमूल्याची रक्कम भरण्याची मुदत दिनांक ३० सप्टेंबर, २००९ पर्यंत वाढवून देण्याची पुन्हा विनंती केलेली आहे. प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी असे मत व्यक्त केले की, निविदाकारांच्या विनंतीनुसार त्यास ही मुदतवाढ देण्यात यावी. त्यामुळे या क्षेत्रातील अधिमूल्याचा दर व अपेक्षित अधिमूल्याची रक्कम आश्वासित राहील. श्री.वसंत डावखरे, उपसभापती, विधान परिषद यांनी सुध्दा मुदतवाढ देण्यास सहमती दर्शविली. पुढे सर्वानुमते असे ठरले की, भूखंड क्र.सी-८, आर १.१ व आर १.४ या भूखंडांकरीता सप्टेंबर, २००९ पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी. जर सदर वाढीव मुदतीत निविदाकारांनी अधिमुल्याची पूर्ण रक्कम भरली नाही तर सदर देकार रद्द करण्यात यावा व नव्याने निविदा मागवाव्यात. यासंदर्भातील कार्यवृत्त कायम करण्याची वाट न बघता या निर्णयानुसार मुदतवाढीबद्दल महानगर आयुक्तांनी निविदादारांस कळवावे.

**बाब क्र.६ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. च्या क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणेबाबत विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून करावयाच्या कार्यवाहीबाबत.**

६.१ महानगर आयुक्त यांनी माहिती देताना असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने दिनांक १४ मे, २००९ च्या अधिसूचना क्र.टिपीबी-४३०८/३७०९/सीआर-३४७/०८/युडी-११, अन्वये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१) (सी) मधील तरतुदीनुसार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई इटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि.च्या क्षेत्रासाठी (उक्त क्षेत्र) काही अटींवर नेमणूक केली आहे.

६.२ प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी असे सांगितले की, या जमिनीवर मोठया प्रमाणावर झोपडपट्टी असून काही ठिकाणी (SRA) झोपडपट्टी पुनर्वसन काम करते. त्यामुळे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यामध्ये समन्वय असून सर्व सभासदांनी याबाबत सहमती दर्शविली.

६.३ त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२०७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** महाराष्ट्र शासनाने या प्राधिकरणाची महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४० (१)(सी) मधील तरतुदींनुसार विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. च्या क्षेत्रासाठी केलेल्या नेमणूकीच्या अनुषंगाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. च्या क्षेत्राकरीता (उक्त क्षेत्र) विकास योजना / नियोजन प्रस्ताव तयार करण्यासाठी शासन निर्गमित करेल त्या निर्देशानुसार पुढील आवश्यक ती सर्व कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ च्या तरतूदीनुसार करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.७</u> : <u>प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल दिनांक १ सप्टेंबर, २००८ ते दिनांक ३० जून, २००९.</u>**

दिनांक १ सप्टेंबर, २००८ ते ३० जून, २००९ या कालावधीत केलेल्या गुंतवणूकीच्या अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**<u>बाब क्र.८</u> : <u>मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहय क्षेत्रातील रस्त्यांची सुधारणा करणे.</u>**

८.१ महानगर आयुक्त यांनी या टिप्पणीबाबत थोडक्यात माहिती दिली. त्यांनी असे सांगितले की, या योजनेंतर्गत ग्रामीण भागातील रस्ते सुधारीत करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. सदर रस्त्याचा विकास करण्याची बाहय रस्ते विकास योजना सन १९८६-८७ पासुन सुरु करण्यात आली आहे. ही योजना त्या त्या संस्थेकडून राबविण्यात येते. या अंतर्गत जिल्हा परिषदांना व नगर परिषदांना एकूण खर्चाच्या अंशतः अनुदान देण्यात येते. ही योजना सन १९९०-९१, १९९६-९७ या साली वाढविण्यात आली. नवीन रस्त्याचा अंतर्भाव करण्यात आला म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विद्यमान रस्त्याची सुधारणा करण्यासाठी आणि नवीन रस्त्याच्या राहून गेलेल्या जोडमार्गाचा विकास करण्यासाठी जिल्हापरिषदा व नगरपरिषदा यांच्यासारख्या कार्यान्वयीन संस्थांना प्राधिकरणाच्या निधीतून सुधारीत अंदाजित खर्चाच्या ७५% अनुदान देऊन रस्त्यांची कामे पूर्ण करुन द्यावीत असा प्राधिकरणाच्या दिनांक १२ मार्च, १९९८ रोजीच्या ९२ व्या बैठकीत ठराव क्र.७७९ अन्वये निर्णय झाला. सदर संस्थांना प्रकल्प राबविणे आर्थिकदृष्टया शक्य व्हावे म्हणून प्राधिकरणाने दिनांक १४ फेब्रुवारी, २००० रोजी झालेल्या ९७ व्या बैठकीत वितरीत करण्यात येणाऱ्या अनुदानात ९०% इतकी वाढ करण्यास मान्यता दिली आहे.

८.२ महानगर आयुक्तांनी प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, प्राधिकरणाचे निमंत्रित श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी ३ रस्त्यांचे

कामाचे प्रस्ताव सादर केले आहेत. तसेच श्री.सुरेश शंकर म्हात्रे, सदस्य, जिल्हा परिषद रायगड यांनी ६ कामांची यादी सादर केलेली आहे तसेच मा.मुख्याधिकारी, कर्जत नगर परिषद यांनी रस्ते सुधारण्याकरिता एकूण ४ कामांची यादी सादर केली आहे. तसेच, मा.मुख्याधिकारी, अंबरनाथ नगर परिषद यांनी एकूण २ कामांची यादी सादर केलेली आहे. सदर प्रस्तावांना संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या ठरावासह पाठविण्यात आलेले आहेत. सदर रस्त्यांच्या कामांना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बाहय रस्ते विकास योजना अंतर्गत अनुदान मिळण्याची विनंती केलेली आहे. सदर कामांची अंदाजपत्रके तयार करताना सन २००९-१० च्या जिल्हा दरसूचीचा व ज्या बाबींसाठी जिल्हा दरसूची (DSR) उपलब्ध नाहीत तेथे रेट ॲनॅलिसेस केलेले दर गृहीत धरुन अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत. वरील रस्त्यांची क्षेत्रिय पाहणी बाहय रस्ते विकास योजनेतील तरतुदी कामांची आवश्यकता, या बाबींचा विचार करुन कर्जत, अंबरनाथ व कुळगाव, बदलापूर नगर परिषद तसेच रायगड जिल्हा परिषद यांनी सादर केलेल्या एकूण १५ कामांची प्रस्तुत यादी सामान्य प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे. मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी अशी इच्छा प्रदर्शित केली की, संबंधित नगर परिषदांना रस्त्याच्या विकासाकरीता एम.यु.आय.एम.एफ.आर.ए. किंवा इतर योजनेअंतर्गत कर्ज देण्यात येऊ नये याची खात्री नगर विकास विभागाचे सचिव यांनी करावी. रायगड जिल्हा परिषद, कुळगाव-बदलापूर, कर्जत व अंबरनाथ नगर परिषद. या सर्वांसाठी उप-प्रकल्प ७ ब म्हणून मंजूर करुन सदर उप-प्रकल्पास प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी अशी प्राधिकरणास विनंती करण्यात येत आहे.

८.३ त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२०८ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१-अ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेशातील (महापालिका क्षेत्राबाहेरील) रस्त्यांची सुधारणा करण्याच्या प्रकल्पांतर्गत मुंबई महानगर प्रदेशातील रायगड जिल्हा परिषद, कुळगांव-बदलापूर नगर परिषद, कर्जत नगर परिषद व

अंबरनाथ नगर परिषद अंतर्गत येणा-या खालील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी सुमारे ३०.५० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे :-

| क्र. | जिल्हा परिषद / नगर परिषद | रस्त्यांच्या सुधारणासाठी अंदाजित खर्च (रुपये लाखात) |
|---|---|---|
| अ) | **रायगड जिल्हा परिषद** | |
| १. | रिसभटवाडी रस्ता डांबरीकरण करणे. | १०.०० |
| २. | मोपाडा पोलीस चौकी मोहपाडा कातरकरवाडी रस्ता डांबरीकरण करणे. | १५.०० |
| ३. | नवीन पोसरी ते खारकर यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ८.०० |
| ४. | रिस पाताळगंगा टिंबर ते चारुदत्त कांबळे यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | ७.०० |
| ५. | रिस आग्रीसेना कार्यालय ते काळणवाडी रस्ता डांबरीकरण करणे. | ८.०० |
| ६. | आळे-आंबिवली ते स्मशानभूमी रस्ता काँक्रिटीकरण करणे. | ७.०० |
| ब) | **कुळगांव-बदलापूर नगर परिषद** | |
| १. | रेल्वे स्टेशन पूर्व पासून ते मच्छी मार्केट ते होप इंडिया एम.आय.डी.सी. ला जोडणारा रस्ता तयार करणे. | ६७६.३८ |
| २. | आदर्श विद्यालय ते संभाजी नगर एम.आय.डी.सी. रस्ता तयार करणे. | ३४५.६८ |
| ३. | कात्रप रोड, निरामय बिल्डींग ते रेल्वे लाईन समांतर नवीन डी.पी.रस्ता तयार करणे. | ६८१.५७ |
| क) | **अंबरनाथ नगर परिषद, अंबरनाथ** | |
| १. | शिवाजी चौक ते स्वामी समर्थ चौकपर्यंत रस्ता तयार करणे. | ५३५.०० |
| २. | स्वामी समर्थ चौक ते शिव मंदीर उल्हासनगर गेट रस्ता तयार करणे. | ४७८.०० |
| ड) | **कर्जत नगर परिषद** | |
| १. | भिसेगांव चौक ते बस स्थानकास जाणारा रस्ता तयार करणे. | ९३.२१ |
| २. | बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते नदीघाट रस्ता तयार करणे. | ५५.९१ |
| ३. | गुंडगे येथील माल धक्का ते नजमुद्दीन मुल्ला यांच्या चाळीतील संत रोहिदास नगर पर्यंत रस्ता तयार करणे. | २४.५६ |
| ४. | डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते कोतवाल नगर पर्यंत रस्ता तयार करणे. | १०४.२४ |
| | **एकूण अ + ब + क + ड** | **३०४९.५६** |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या रस्त्यांच्या कामासाठी व यापूर्वी मंजूर केलेल्या कामांसाठी अंदाजित खर्चाच्या ९०% एवढे अनुदानाची प्राधिकरणाच्या सन २००९-१० च्या अंदाजपत्रकात तरतूद करुन हे अनुदान रायगड जिल्हा परिषदेस, कर्जत, कुळगांव, बदलापूर, अंबरनाथ या नगर परिषदेस देण्यास प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** या संबंधात आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास आणि सर्वसाधारण मान्यता देण्यास तसेच वेळोवेळी अनुदान वितरीत करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.९ : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी कर्ज सहाय्य देणे.**

९.१ महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, प्राधिकरणाने दिनांक १० फेब्रुवारी, २००९ रोजी झालेल्या १२४व्या बैठकीमध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सन २००३-०४ ते २००७-०८ या पाच वर्षाच्या वित्तीय स्थितीच्या विश्लेषणावर आधारीत पालिकेच्या भविष्यातील कर्ज परतफेडीच्या क्षमतेनुसार जेएनएनयुआरएम अंतर्गत मंजूर झालेल्या रु.२२५.०४ कोटी खर्चाच्या भूयारी मलनिःसारण व पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था या दोन्ही प्रकल्पांसाठी ५०% पालिकेच्या हिश्यापोटी रु.११२.५२ कोटी एवढे कर्ज मंजूर केले. यावेळी झालेल्या चर्चेमध्ये कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने मागणी केलेल्या अतिरिक्त कर्जाच्या रकमेसंबंधी परतफेडीच्या क्षमतेबाबत सुधारीत प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर प्राधिकरण वाढीव कर्जाबद्दल पुनर्विचार करेल असे ठरविण्यात आले.

९.२ त्याप्रमाणे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सन २००८-०९ या वर्षाची प्रत्यक्ष वार्षिक वित्तीय आकडेवाडी सादर करुन आतापर्यंत जेएनएनयुआरएम योजनेंतर्गत मंजूर झालेल्या चार प्रकल्पांकरीता पूर्वी प्राधिकरणाने मंजूर केलेल्या रु.११२.५२ कोटी कर्ज रकमेव्यतिरिक्त रु.१८०.२१ कोटी एवढया वाढीव रकमेसह एंकूण रु.२९२.७३ कोटी (एकूण खर्चाच्या ५०%) कर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सादर केलेल्या प्रस्तावांचा तपशील खालील तक्त्यात दिला आहे :-

(रुपये कोटीत)

| अ.क्र. | प्रकल्प | एकूण खर्च | कर्जाची मागणी |
|---|---|---|---|
| १. | मलनिःसारण प्रकल्प | १६९.६३ | ८४.८१ |
| २. | पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था | ५५.४० | २७.७० |
| ३. | १५० द.ल.लि. पाणी पुरवठा योजना | १०६.८१ | ५३.४१ |
| ४. | पाणी पुरवठा योजनेचे आवर्धन (Augmentation) | २५३.६३ | १२६.८१ |
| | | ५८५.४७ | २९२.७३ |

९.३ महानगर आयुक्त यांनी असेही स्पष्ट केले की, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या पुनर्मुल्यांकन अहवालानुसार महानगरपालिकेला रु.२९२.७३ कोटी कर्ज द्यावयाचे असल्यास कर्ज वितरणाच्या कालावधीत म्हणजेच वर्षे २००९-१०, २०१०-११ व २०११-१२ या वर्षात कर्ज

..१५/-

परतफेडीत सूट (मोरॅटोरियम) द्यावी लागेल आणि या कालावधीत देय होणा-या व्याजाचे कर्जात रुपांतर करावे लागेल. याशिवाय या वर्षामध्ये पालिकेला आपल्या जेएनएनयुआरएम आणि बीएसयूपी प्रकल्पांव्यतिरिक्त इतर भांडवली कामांच्या खर्चावर मर्यादा घालाव्या लागतील व असा खर्च अनुक्रमे रु.३४ कोटी, रु.५७ कोटी व रु.७५ कोटी यापेक्षा जास्त होणार नाही अशी खबरदारी घ्यावी लागेल. या अटींवरच महानगरपालिकेला मलनिःसारण प्रकल्प, पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था, १५० द.ल.लि. पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा योजनेची क्षमता वाढविणे या मंजूर अंदाजित खर्च रु.५८५.४७ कोटीच्या प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यासाठी एकूण रु.२९२.७३ कोटी म्हणजेच प्रकल्पांच्या एकूण मंजूर खर्चाच्या ५०% एवढया कर्जाची परतफेड करण्यास सक्षम आहे असे दिसून येते.

९.४ त्यानंतर, बाब टिपणणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२०९ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २१-अ अन्वये प्राधिकरणास प्राप्त झालेल्या व त्यास यासंबंधी सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या जेएनएनयुआरएम अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेल्या मलनिःसारण प्रकल्प, पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था, १५० द.ल.ली. पाणी पुरवठा योजना व पाणी पुरवठा योजनेची क्षमता वाढविणे अशा एकूण रु.५८५.४७ कोटी खर्चाच्या चार प्रकल्पांसाठी पालिकेने केलेली कर्जाची विनंती मान्य करुन मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस रु.२९२.७३ कोटी इतकी सुधारीत कर्ज रक्कम, प्राधिकरणाने पूर्वी मंजूर केलेले रु.११२.५२ कोटी कर्ज रद्द करुन, द.सा.द.शे. ८% व्याज दर आकारुन १५ वर्षाच्या कर्ज परतफेडीच्या कालावधीसाठी बाब टिप्पणीत प्रस्तावित केलेल्या अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** कर्जाची रक्कम, व्याज दर आणि कर्ज परतफेडीचा कालावधी या अटींव्यतिरिक्त एस्क्रो खात्यासंबंधी तपशील व कर्ज परतफेडीतील

सुटीचा कालावधी निश्चित करणे, तसेच प्रकल्प अंमलबजावणी कालावधी, आगाऊ कर्ज सहाय्य देणे तसेच कर्जाच्या इतर अटी व शर्तींमध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

**“आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** यापूर्वी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेस मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून मंजूर केलेली रु.११२.५२ कोटी कर्ज रक्कम रद्द करण्यासाठी सुयोग्य कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.”

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कर्मचा-यांकरीता गट उपदान-नि-आयुर्विमा योजना.**

**१०.१** महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती दिली. केंद्र शासनाने गट उपदान अधिनियम, १९७२ मध्ये दुरुस्ती केली असून त्यानुसार गट उपदानाची रक्कम रु.३.५० लाखावरुन रु.१० लाखापर्यंत वाढविली आहे. त्यानुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील कर्मचा-यांनासुध्दा गट उपदानाची रक्कम ही रु.३.५० लाखाहून रु.१० लाख वाढविण्याची विनंती महानगर आयुक्तांनी प्राधिकरणास केली. त्यावर मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी याबाबत असे निदेश दिले की, गट उपदानाची रक्कम रु.३.५० लाखाहून रु.७.०० लाखापर्यंत वाढविण्यात यावी.

**१०.२** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२१० :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे पोटकलम (२) आणि उक्त अधिनियमाचे कलम ५० अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण (कर्मचारी उपदान प्रदान) विनियम, १९८९ च्या विनियम क्र.३ मधील तरतूदीनुसार प्राधिकरणातील कर्मचा-यांना गट उपदान-नि-जीवन विमा योजनेखालील उपदान प्रदानाची कमाल मर्यादा दिनांक १ जानेवारी, २००६ पासून रु.३.५० लाखावरुन रु.७.०० लाखापर्यंत वाढविण्यास मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** या ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.११ : मुंबई महानगर प्रदेशातील पूर्व उप-प्रदेशाच्या पाणी पुरवठयात सुधारणा घडविण्यासाठी शाई धरणाचा विकास.**

**११.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात तरतूद करुन महानगर प्रदेशासाठी निश्चित केलेले पाणी पुरवठयाचे स्त्रोत विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत .शाई धरणाचा विकास करुन मुंबई महानगर प्रदेशातील पूर्व उप-प्रदेशाच्या पाणी पुरवठयात सुधारणा घडविण्याचे योजले आहे. त्यानंतर शाई प्रकल्पाबाबत ठळक वैशिष्टये देऊन सदर धरणाचे बांधकाम कोंकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे करण्यात येणार आहे असे सांगितले. त्यासाठी कोंकण पाटबंधारे विकास महामंडळास धरण बांधकामासाठी लागणारी साधनसामुग्रीवरील अग्रीम रक्कम (Mobilization Advance) म्हणून रु.१५ कोटी इतका निधी देण्यात आला. त्यास कार्योत्तर मंजूरी प्रस्ताविण्यात आली आहे.

**११.२** प्राधिकरणाचे निमंत्रित श्री.नंदकिशोर पातकर, नगराध्यक्ष, कुळगांव-बदलापूर नगरपरिषद यांनी असे सांगितले की, शाई धरणाच्या प्रकल्पास तेथील ग्रामस्थांचा विरोध आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, सांडपाण्याचे शुध्दीकरण करुन त्याचा पुनर्वापर करावा असे चितळे समितीने सूचविले आहे. याबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशातील पाणी पुरवठयाच्या समस्येमुळे या योजना राबविणे गरजेचे आहे. महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, चितळे समितीने सन २००५ मध्ये अहवाल देऊन मुंबई महानगर प्रदेशासाठी (मुंबई वगळून) पाणी पुरवठयाचे स्त्रोत निश्चित केले आहेत व त्यास मंत्रिमंडळाची सुध्दा मान्यता आहे. शाई धरण व पाणी पुरवठा योजनेच्या कामासाठी प्राधिकरणाचे उत्तरदायित्व हे भांडवली खर्च रु.१२०० कोटी असून दरवर्षी पुढील ६ वर्षात साधारण रु.२०० कोटीचा खर्च प्राधिकरणास अपेक्षित आहे. डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त यांनी त्यांच्या महानगरपालिका क्षेत्रात लागणा-या पाण्याच्या स्त्रोताचा विकास करण्यासाठी लागणा-या कर्जाची मागणी प्राधिकरणाकडे केली. त्यावर महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणामार्फत जरुर असेल त्याप्रमाणे कर्ज सहाय्य देण्यात येईल असे सांगितले.

**११.३** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२११ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की**, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण पुढील बाबींस मान्यता देत आहे :-

(अ) शाई धरणाचे बांधकाम करण्यासाठी व धरणाची अनुषंगीक कामे पार पाडण्यासाठी कोकण पाटबंधारे विकास महामंडळास धरणाचा एकूण खर्च रु.६४५.४० कोटी पर्यंत कामाच्या प्रगतीनुसार पुढील सहा वर्षाच्या कालावधीत देयकानुसार व मागणीनुसार अधिदान करण्यास.

(ब) सन २००९-१० या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पीय शिर्ष-अभियांत्रिकी अनुक्रमांक १४ प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोत विकास या निधीचे सुयोग्य पध्दतीने पुनर्विनियोजन करुन शाई धरणासाठी अग्रीम रक्कम (Mobilisation Advance) रु.१५ कोटी कोंकण पाटबंधारे विकास महामंडळास वितरीत करण्यात आले त्यास कार्योत्तर मंजूरी. तसेच धरणाच्या चालू आर्थिक वर्षातील कामाच्या खर्चाची तरतूद म्हणून रु.९० कोटी, निधीचे योग्यप्रकारे पुनर्विनियोजन करुन शिर्ष-अभियांत्रिकी अनु.क्र.१४ - प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोत विकास हया शिर्षकाखाली सुधारीत अंदाजपत्रक करण्याबाबत प्रशासकीय मंजूरी.

(क) कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यादरम्यान धरण बांधकामासंबंधीचा आवश्यक तो सामंजस्य करार करण्याचे अधिकार महानगर आयुक्तांना प्रदान करण्यास मान्यता.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की**, वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी व प्रकल्पाबाबत आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१२ : मुंबई महानगर प्रदेशातील (मुंबई वगळून) पाणी पुरवठयात सुधारण घडविण्यासाठी राबविण्यात येणारे शाई, पोशिर, काळू प्रकल्प व सूर्या पाणी पुरवठा योजनेबाबत.**

**१२.१** महानगर आयुक्त यांनी सदर प्रस्तावाबात थोडक्यात माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशातील (मुंबई वगळून) पाणी पुरवठयात सुधारणा घडविण्यासाठी शाई, पोशिर,

काळू प्रकल्प व सूर्या धरणातून ३०३ एम.एल.डी. पाणी पुरवठा योजना ही कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे हाती घेऊन पार पाडण्याचे योजिले आहे. यातील धरणांचा विकास करण्यासाठी व नळपाणी पुरवठा योजना करण्यासाठी लागणारा निधी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकंरणातर्फे पाणी पुरवठा योजनेच्या उत्पन्नाचा हिस्सा भागभांडवलीपोटी प्राधिकरणास परत मिळणार या तत्वावर करण्याचे योजले आहे. धरणांची व त्यातील पाणी साठयाचा संपूर्ण मालकी हक्क कायमस्वरुपी प्राधिकरणाकडे राहील. पुढील १० वर्षात या कामासाठी साधारण ४७३१ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे व प्रत्येक वर्षी साधारण रु.४०० कोटी रुपये इतकी तरतूद अर्थसंकल्पात या प्रकल्पांच्या कामासाठी प्राधिकरणाला करावी लागेल. प्राधिकरणाचे सदस्य श्री.रविंद्र वायकर, अध्यक्ष, स्थायी समिती, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सूचविले की, या प्रकल्पातून वीज निर्मितीबाबतची शक्यता पडताळावी. त्यावर महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्रत्येक धरणांच्या ठिकाणी वीज निर्मितीसाठी लागणारी सर्व व्यवस्था करण्यात येणार आहे. धरणांची बांधकामे कोंकण पाटबंधारे विकास महामंडळातर्फे करण्यात येतील. या चर्चेच्यावेळी बोलताना मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सूचित केले की, पोशिर व काळू धरणांचे बांधकाम तसेच त्यावरील नळपाणी पुरवठा योजना ही कामे पाटबंधारे विभाग किंवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना न देता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावीत. तसेच शाई व. सुर्या नळ पाणी पुरवठा योजना ही कामेसुध्दा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे करण्यात यावीत. त्यावर महानगर आयुक्त यांनी त्याप्रमाणे व्यवस्था करुन कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. या सर्व योजनांतून महानगर प्रदेशातील स्थानिक स्वराज्य संस्थांना घाऊक पध्दतीने (Bulk Supply) पाणी पुरवठा होणार आहे व पाणी वितरणाचा हक्क प्राधिकरणाकडे राहणार आहे.

**१२.२** त्यानंतर, बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२१२ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (क), (ड), (ई) व (ग)

अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण पुढील बाबींस मान्यता देत आहे :-

(अ) मुंबई महानगर प्रदेशात (मुंबई वगळून) पाणी पुरवठयात सुधारणा घडविण्यासाठी शाई, पोशिर व काळू धरणांचा विकास व त्यातील पाणी साठयाचे शुध्दीकरण करुन स्थानिक स्वराज्य संस्थांना नळपाणी पुरवठा योजनेद्वारे घाऊक प्रमाणात (Bulk supply) पाणी वितरण करणे तसेच पश्चिम उप-प्रदेशासाठी सुर्या पाणी पुरवठा योजना राबविणे या कामांचा अपेक्षित खर्च रु.४७३१.०४ कोटी यास प्रशासकीय मान्यता.

(ब) धरणांचे बांधकाम व पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा कार्यक्रम व प्रगतीनुसार आगामी कालावधीत प्रतिवर्षी जरुरीप्रमाणे अर्थसंकल्पात आर्थिक तरतूद करण्याची मान्यता.

(क) शाई धरणाचे बांधकाम कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्या सहाय्याने करणार असल्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ यांच्यात करावयाचा आवश्यक तो सामंजस्य करार करण्यास महानगर आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता.

(ड) पोशिर व काळू धरणांचे बांधकाम व पाणी पुरवठयाची कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यासाठी व याबाबत पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्तांना अधिकार प्रदान करण्यास मान्यता.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी व प्रकल्पाबाबतच्या विकासाबाबत आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१३ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गापासून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी सहार उन्नत मार्गाचे बांधकाम करणे.**
**– टपाल व तार वसाहत, सहार येथील टपाल खाते व भारत संचार निगम मर्यादित यांच्या जमिनीच्या बदल्यात वडाळा ट्रक टर्मिनल टप्पा-१ मधील भूखंड क्र.'फ' देणेबाबत व ओशिवरा येथे बदल्यात सदनिका देणेबाबत.**

**१३.१** महानगर आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती देताना असे सांगितले की, सदरहू रस्ता हा मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पश्चिम द्रुतगती महामार्गापासून छत्रपती शिवाजी आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाण्यासाठी सहार उन्नत या मार्गाचे बांधकाम

करावयाचे आहे. सदरहू रस्ता २ कि.मी. चा असून त्याच्या बांधकामाचा खर्च रु.२८७.३७ कोटी इतका आहे. सदर काम हे जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानामध्ये केंद्र शासनाने अंतर्भूत केलेले आहे आणि उर्वरित खर्चाचा भर मे.मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रा.लि. यांना करण्याचे मान्य केलेले आहे.

**१३.२** महानगर आयुक्तांनी असे प्रतिपादन केले की, उन्नत मार्गाची आखणी ही अंशतः अस्तित्वातील सहार रस्त्यावरुन घेण्यात आलेली असून उर्वरित आखणी पूर्णपणे नवीन आहे. सदर नवीन आखणीमध्ये जी.व्ही.के.वसाहत (विमानतळ वसाहत), टपाल व तार वसाहत, भारतीय विमानतळ प्राधिकरण वसाहत, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ मर्यादित (मे.एम.आय.ए.एल) यांची जागा अंतर्भूत आहे. यापैकी मे.एम.आय.ए.एल. यांच्या जागेवरील बामणवाडा, डॉ.आंबेडकर नगर, संभाजी नगर, राजाराम वाडी या ठिकाणच्या अतिक्रमणाच्या पुनर्वसनाची जबाबदारी मे.एम.आय.ए.एल.यांनी स्विकारली आहे. मे.एम.आय.ए.एल. सोबत झालेल्या सामंजस्य करारानुसार मे.एम.आय.ए.एल. यांच्या अधिपत्याखाली नसलेल्या जमिनीचे संपादन/हस्तांतरणाची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची आहे. सद्यस्थितीत उन्नत रस्त्याचे काम एकूण २.०० कि.मी. लांबीपैकी जुन्या सहार रस्त्यावरील व इतर उपलब्ध ०.९५० कि.मी. लांबीत जोमाने सुरु आहे. उर्वरीत लांबीत टपाल व तार वसाहत, भा.वि.प्रा.वसाहत, बामणवाडा, डॉ.आंबेडकर नगर इत्यादी भाग येत असल्याने जमीन हस्तांतरणाअभावी कामांस विलंब होत आहे. या उर्वरीत लांबीपैकी २५० मी. लांबी टपाल व तार वसाहती अंतर्गत येते. या जागेत उड्डाणपूलाचे काम खोळंबले आहे व उर्वरित जागेत जमिनीच्या पातळीवर रस्त्याचे काम प्रलंबित आहे.

**१३.३** महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, त्यांनी १९१ सदनिका बाधीत १०४ सदनिकांच्या ऐवजी देय होतात कारण ओशिवराच्या सदनिकांचे प्रत्येकी क्षेत्रफळ २२५ चौ.फुट आहे. टपालखाते व भारत संचार निगम यांना वडाळा ट्रक टर्मिनल टप्पा-१ मधील भूखंड क्र."फ" येथे देता येणा-या चटईक्षेत्र निर्देशांकावरील सुमारे ४७९४ चौ.मी. इतकी आहे. टपाल व तार वसाहत, सहार गाव चटई क्षेत्र निर्देशांक १ वरुन वडाळा ट्रक टर्मिनल येथे उपलब्ध चटई क्षेत्र निर्देशांक ३ असा आहे. परंतु टपाल खात्याच्या तळमजल्या इतकी जागा आहे असे कळविण्यात आले आहे. त्याकरिता त्यांना एक चटई क्षेत्र निर्देशांकानुसार जमीन विक्री केलेली आहे.

**१३.४** त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती दिली. टपाल खाते व भारत संचार निगम मर्यादीत यांना मुंबई जिल्हा, गाव-वडाळा, वडाळा ट्रक टर्मिनल - टप्पा क्र.१, भूखंड क्र.फ मधील ४७९४ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन चटई क्षेत्र निर्देशांक १ प्रमाणे मोबदला म्हणून हस्तांतरीत करणेसाठी मंजूरी देण्याची विनंती आहे.

**१३.५** तसेच टपाल खाते व भारत संचार निगम मर्यादीत यांना मिळून हस्तांतरीत करावयाच्या मुंबई उपनगर जिल्हा, ओशिवरा, वंडरलँड येथील प्राधिकरणाच्या सदनिकांपैकी एकूण १९१ सदनिका त्या खात्यास हस्तांतरीत करण्यास मंजूरी देण्याची विनंती आहे.

**१३.६** भारत संचार निगम मर्यादीत यांना सदनिकांच्या दुरुस्ती, सुधारणांकरिता देण्यात आलेल्या रक्कम रुपये ५७.२० लाख तसेच टपाल खात्यास सदनिकांच्या दुरुस्ती / सुधारणा करणे कामी आवश्यक असलेल्या अंदाजे रक्कम रु.५० लाख या खर्चास अतिरिक्त खर्च म्हणून मंजूरी देण्याची विनंती आहे.

**१३.७** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र.१२१३ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम २ आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (जमिनीची विल्हेवाट) विनियम, १९७७ मधील विनियम १५ मधील अधिकारान्वये उपरोक्त बाबींअंतर्गत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने -

- टपाल खाते व भारत संचार निगम मर्यादीत यांना मुंबई जिल्हा, गाव-वडाळा, वडाळा ट्रक टर्मिनल टप्पा क्र.१, भूखंड क्र.फ मधील ४७९४ चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन चटई निर्देशांक १ प्रमाणे मोबदला म्हणून हस्तांतरीत करणेसाठी मंजूरी देण्यात येत आहे.
- टपाल खाते व भारत संचार निगम मर्यादित यांना मिळून हस्तांतरीत करावयाच्या मुंबई उपनगर जिल्हा, ओशिवरा, वंडरलँड येथील प्राधिकरणाच्या सदनिकांपैकी एकूण १९१ सदनिका त्या खात्यास हस्तांतरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

..२३/-

- भारत संचार निगम मर्यादित यांना सदनिकांच्या दुरुस्ती / सुधारणांकरीता देण्यात आलेल्या रक्कम रु.५७.२० लाख तसेच टपाल खात्यास सदनिकांच्या दुरुस्ती / सुधारणा करणेसाठी आवश्यक असलेल्या अंदाजे रक्कम रु.५० लाख या खर्चास अतिरिक्त खर्च म्हणून मंजूरी देण्यात येत आहे.

- टपाल खाते व भारत संचार निगम मर्यादित यांच्या टपाल व तार वसाहत, सहार, मुंबई येथील ८७५० चौ.मी. क्षेत्रफळाची जमीन त्यावरील गाळयांसह इमारती सहार उन्नत मार्गाच्या कामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करुन घेण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी व प्रकल्पाबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचा-यांना सन २००८-२००९ या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदान मंजूर करणेबाबत.**

**१४.१** महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अ, ब, क, व ड या संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांना (सन २००७-०८ या वित्तीय वर्षासाठी) सानुग्रह अनुदान देण्याबाबत प्राधिकरणाच्या १२३ व्या बैठकीत बाब टिप्पणी क्र.१० सादर करुन त्यास प्राधिकरणाच्या ठराव क्र.११९० अन्वये मान्यता प्राप्त झाल्यावर ८.३३% इतके परंतु जास्तीत जास्त रु.६०००/- इतक्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान वाटप करण्यात आलेले होते.

**१४.२** प्राधिकरणाच्या कर्मचारी/अधिकारी संघटनांनी दिनांक २८ जुलै, २००९ रोजीच्या पत्रान्वये मा.महानगर आयुक्तांना पत्र लिहून अशी विनंती केली आहे की, प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचा-यांना २००८-०९ या वित्तीय वर्षासाठी ८.३३% किंवा रु.१५,०००/- यापैकी जी रक्कम जास्त असेल ती देण्यात यावी अशी मागणी करण्यात आलेली आहे.

**१४.३** महानगर आयुक्त यांनी परिच्छेद क्र.३ बाबत असे सांगितले की, प्राधिकरणाच्या अधिकारी/कर्मचा-यांना २००८-०९ या वर्षाकरिता ८.३३% इतके परंतु जास्तीत जास्त

रु.६०००/- इतके सानुग्रह अनुदान मंजूर झाल्यास सन २००८-०९ या वित्तीय वर्षात अंदाजे रु.३७.२० लाख इतका वित्तीय भार प्राधिकरणावर पडणार आहे.

**१४.४** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२१४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे मुं.म.प्र.वि.प्राधिकरणातील अ, ब, क व ड या संवर्गातील कर्मचा-यांना सन २००८-२००९ या वित्तीय वर्षाकरीता ८.३३% किंवा जास्तीत जास्त रु.६०००/- (रुपये सहा हजार फक्त) या कमाल मर्यादेच्या अधीन राहून सानुग्रह अनुदान देण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** सानुग्रह अनुदानाची रक्कम निश्चित करुन अदा करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१५ : माथेरान पर्यटन क्षेत्रासाठी वाहतूक व्यवस्था सुधारण्याकरीता सेंट्रल रेल्वे आणि एमटीडीसीला आवश्यक मदत करणे.**

**१५.१** महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, माथेरान हे महाराष्ट्रातील एक महत्वाचे व मुंबई महानगर क्षेत्रातील एकमेव हिल पर्यटन क्षेत्र असून दरवर्षी सुमारे ६ लाख पर्यटक याचा लाभ घेतात. परंतु सध्या माथेरानला जाण्यासाठी नेरळहून दिवसातून तीन वेळा ऐतिहासिक मिनी ट्रेन सेवा उपलब्ध आहे. जवळजवळ ८०% पर्यटक दस्तुरी नाक्यापर्यंत रस्त्याने जाऊन पुढे ३ कि.मी. चालत अथवा घोडयावरुन जातात आणि दस्तुरी नाक्यापासून सामान घेऊन जाण्यासाठी कोणतीही सोय नसल्यामुळे सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अपूरी पडते. त्यामुळे माथेरान पर्यटन क्षेत्रासाठी वाहतूक व्यवस्था सुधारण्याची गरज आहे.

..२५/-

१५.२ महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, दस्तुरी पासून ३ कि.मी. शटल सर्विस सुरु करण्याचा प्रकल्प माथेरान गिरीस्थान नगरपरिषद आणि सेंट्रल रेल्वेच्या विचाराधीन आहे. परंतु नगर परिषदेची वित्तीय स्थिती विचारात घेता प्रकल्प खर्चामध्ये त्यांचा सहभाग प्राप्त होणे कठीण दिसते. रेल्वेकडूनही प्रकल्पास प्राथम्य मिळण्याची शक्यता कमी आहे. या प्रकल्पाच्या खर्चासाठी आवश्यकता भासल्यास प्राधिकरणातर्फे मदत करणे विचारात घेता येईल असे सेंट्रल रेल्वेला मार्च २००९ मध्ये कळविण्यात आलेले आहे. माथेरानचे अंतर नेरळपेक्षा कमी असल्यामुळे माथेरानला पोहोचणे सोयीस्कर व्हावे आणि यासंबंधीच्या वाहतूक व्यवस्थेची क्षमता वाढविण्यासाठी खाजगी क्षेत्राच्या सहभागाने पनवेल दिशेकडून फिनीक्युलर रेल्वे व्यवस्था निर्माण करण्यासंबंधी प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या विचाराधीन आहे.

१५.३ महानगर आयुक्तांनी माथेरान आणि दस्तुरी नाक्यादरम्यान पर्यटक आणि सामानाची वाहतूक करण्यासाठी शटल सर्विस सुरु करणे आणि संबंधित सुविधा निर्माण करण्यासाठी सेंट्रल रेल्वेला आवश्यक वित्तीय मदत करणे तसेच पनवेलच्या दिशेने माथेरानपर्यंत खाजगी क्षेत्राच्या सहभागाने फिनीक्युलर रेल्वे व्यवस्था निर्माण करण्यासंबंधी तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता तपासण्याकरिता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास आवश्यक वित्तीय मदत करणे असे दोन प्रस्ताव सादर केले.

१५.४ यासंबंधी झालेल्या चर्चेअंती प्राधिकरणाने प्रस्तावास मान्यता दर्शविली. परंतु मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी फिनीक्युलर रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाऐवजी प्राधिकरणाने खाजगी क्षेत्राच्या सहभागाने करावी आणि आवश्यक असल्यास व्हाएबिलीटी गॅप फंडींग प्राधिकरणाने उपलब्ध करुन द्यावे अशी सूचना केली. तसेच माथेरान पर्यटन क्षेत्रासाठी पॅकेज तयार करुन इतर आवश्यक कार्यक्रमांचा आवश्यकतेनुसार समावेश करावा असे निर्देश दिलेत.

१५.५ त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२१५ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२-जी अंतर्गत प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, माथेरान पर्यटन क्षेत्रासाठीची वाहतूक

व्यवस्था सुधारण्याकरीता सेंट्रल रेल्वेला आवश्यक वित्तीय मदत करणे आणि खाजगी क्षेत्राच्या सहभागाने फिनीक्युलर रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी प्राधिकरणाने करण्यास आणि यासाठी आवश्यक व्हाएबिलीटी गॅप फंडींग उपलब्ध करुन देण्यास तत्वतः मान्यता देत आहे. माथेरान पॅकेजसाठी आणखी आवश्यक सुविधा आवश्यक असल्यास त्यांचाही समावेश करण्यात यावा. त्याशिवाय माथेरानसाठी सर्वंकष विकास आराखडा तयार करण्यासाठी योग्य सल्लागार नेमण्यात यावा.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाच्या अनुषंगाने तपशीलवार प्रस्ताव तयार करण्यासंबंधी आवश्यक असलेली पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१६ : प्राधिकरणामार्फत इनोव्हेशन पार्क (Innovation Park) हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यास मान्यता देणेबाबत.**

**१६.१** महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, २१ व्या शतकातील भारताच्या विज्ञान व तंत्रज्ञानावर आधारीत प्रगतीसाठी मुंबई महानगर प्रदेशामध्ये अथवा त्याच्याजवळ जागतिक दर्जाचे इनोव्हेशन पार्क प्रस्थापित करण्याचा निर्णय दिनांक १० फेब्रुवारी, २००९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२४ व्या बैठकीत घेण्यात आला असून त्यासाठी आवश्यक असणारा प्राथमिक अभ्यास, सर्वेक्षण इत्यादीसाठी रु.१ कोटीची तरतूद चालू वर्षाच्या अर्थसंकल्पात केली आहे.

**१६.२** महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, इनोव्हेशन पार्कची स्थापना करताना भविष्यातील विज्ञान व तंत्रज्ञानाच्या गरजा लक्षात घेतल्या जातील व इनोव्हेशन पार्कच्या नियोजनामध्ये शिक्षण व संशोधनास पोषक असणा-या आधुनिक सोयींचा विचार केला जाईल व पर्यावरणास पूरक राहतील अशी नियोजन रचना केली जाईल. अशाप्रकारचे प्रस्तावित इनोव्हेशन पार्क हे जगातील सर्वात मोठे संशोधन आणि विकास क्षेत्र ठरेल व सुमारे १०० पेक्षा जास्त देशातील सुमारे २५,००० शास्त्रज्ञ येथे आपले लोकोपयुक्त संशोधन करतील. सुमारे ५ हजार एकर परिसरातील या पार्कमध्ये अनेक सरकारी, निमसरकारी संशोधन संस्था तसेच भारतातील आणि भारताबाहेरील विविध औद्योगिक संशोधन संस्था या स्वतःच्या प्रयोगशाळा स्थापन करतील असे अपेक्षित आहे. त्याचबरोबर जगप्रसिध्द शैक्षणिक संस्था ही या पार्कमध्ये कार्यान्वित होतील व हा पार्क शिक्षण व संशोधनाचा समन्वयाचा केंद्रबिंदू ठरेल. इनोव्हेशन पार्क हे नवीन विकास केंद्र म्हणून प्राधिकरण विकसित करेल व मुंबई महानगर प्रदेशाच्या आर्थिक बळकटीस व रोजगार वाढविण्याच्या दृष्टीकोनातून हे एक महत्वाचे पाऊल ठरेल.

**१६.३** महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, इनोव्हेशन पार्कची संकल्पना ठरविताना जगातील अनेक नावाजलेल्या इनोव्हेशन पार्कचा अभ्यास केला जाईल व त्यातील वैशिष्टये लक्षात घेऊन भारतीय वातावरणास अनुकूल व येथील मनुष्यबळाचा योग्य वापर करता येईल ही बाब केंद्रस्थानी ठेवून या पार्कचा विकास केला जाईल. जगातील यशस्वी इनोव्हेशन पार्कबरोबर प्रस्तावित इनोव्हेशन पार्क सामंजस्य करार करुन तंत्रज्ञानाचे आदानप्रदान करेल. त्यापैकी एक महत्वाचा इनोव्हेशन पार्क फ्रान्समधील "सोफिया ॲन्टिपोलिस" हा राहील व त्याबरोबर सामंजस्य करार करता येणे शक्य आहे. केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाने सुमारे ७३ इतर देशांबरोबर विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रातील सामंजस्य करार केले असून त्याचा उपयोग या प्रस्तावित इनोव्हेशन पार्कला निश्चितच होईल. याशिवाय जगातील महत्वाच्या संशोधन संस्था, वेगवेगळया जागतिक दर्जाच्या उद्योगांची संशोधन केंद्रे तसेच जागतिक दर्जाच्या शैक्षणिक व संशोधन संस्था यांचा सहभाग प्रस्तावित पार्कसाठी करुन घेण्यात येईल. केंद्र शासनाच्या अनेक विभागांचे उदा.विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय (मिनिस्ट्री ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी), नगर विकास मंत्रालय (मिनिस्ट्र ऑफ अर्बन डेव्हलपमेंट), पर्यावरण व वन मंत्रालय (मिनिस्ट्री ऑफ इन्व्हायरन्मेंट अँड फॉरेस्ट), कृषि मंत्रालय (मिनिस्ट्री ऑफ ॲग्रीकल्चर), वाणिज्य व औद्योगिक मंत्रालय (मिनिस्ट्र ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीयल), लघु व मध्यम उद्योग मंत्रालय (मिनिस्ट्री ऑफ मायक्रो स्मॉल अँड मिडियम इंटरप्रायझेस) इ. मंत्रालयातील वेगवेगळया विभागांचा सहभाग या पार्कचा प्रकल्प राबविण्यासाठी केला जाईल.

**१६.४** महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, विज्ञान व तंत्रज्ञान पार्क, पुणे या केंद्र शासनाच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या सहकार्याने स्थापन झालेल्या आणि मागील ३ वर्षापासून इनोव्हेशन पार्क स्थापन करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या आणि जगातील सर्वात यशस्वी अशा "सोफिया ॲन्टिपोलिस" या फ्रान्समधील संस्थेबरोबर दिनांक १९ सप्टेंबर, २००६ रोजी सामंजस्य करार केलेल्या संस्थेचे सदर इनोव्हेशन पार्क स्थापण्यासंबंधीत प्राधिकरणाला सहकार्य घेता येईल. इनोव्हेशन पार्क पुर्णत्वास आल्यास सुमारे २५ हजार शास्त्रज्ञ व १ लाख इतर कर्मचारी कार्य करतील व सुमारे ८ लाख तरुणांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नोकऱ्या उपलब्ध होतील.

**१६.५** या प्रकल्पाबद्दल माहिती देताना महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, इनोव्हेशन पार्क प्रकल्प यशस्वी होण्यासाठी सर्वात महत्वाचा घटक हा दर्जात्मक, तांत्रिक व बौध्दिक मनुष्यबळ आहे. कोणत्याही संशोधनासाठी आवश्यक अशा पोषक वातावरणाची निर्मिती करणे हे या पार्कचे उद्दिष्ट आहे. इनोव्हेशन पार्कच्या यशासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील समन्वय, मुबलक पाण्याची सोय, अखंडीत विद्युत प्रवाह, सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाची उपलब्धता, मनोरंजनाच्या विविध सोयीसुविधा, शैक्षणिक व वैद्यकीय सुविधा असणे अत्यंत आवश्यक आहे. जगभरात इनोव्हेशन पार्क हे वित्तीय केंद्रापासून १-२ तासाच्या अंतरावर विकसित झाले आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता मुंबई महानगर प्रदेशामध्ये अथवा त्याच्या जवळ असा पार्क विकसित करणे संयुक्तिक ठरते. या प्रकल्पासाठी लागणा-या मुलभूत सुविधा देण्यास प्राधिकरण सक्षम असल्याने हा प्रकल्प मुंबई महानगर प्रदेशामध्ये अथवा त्याच्याजवळ राबविणे योग्य राहील व तो त्वरीत विकसनशील होऊ शकेल. या अनुषंगाने प्राधिकरणाने इनोव्हेशन पार्क हा प्रकल्प सुमारे ५००० एकर जागेवर विकसित करण्याची महत्वाकांक्षी योजना आखलेली आहे. सदर प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने व त्यासंबंधित पुढील कार्यवाही करण्याच्या उद्देशाने दिनांक २४ जुलै, २००९ च्या कार्यदिशान्वये महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली एका व्हिजन ग्रुपची स्थापना केली आहे. या व्हिजन ग्रुपमध्ये श्री.आनंद महिंद्रा, उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक, महिंद्रा आणि महिंद्रा, प्रो.अरुण निगवेकर, माजी अध्यक्ष, युजीसी, पुणे, श्री.राजेंद्र जगदाळे, महासंचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, विज्ञान आणि तंत्रज्ञान पार्क, पुणे या संबंधित क्षेत्रातील नामवंतांचा समावेश आहे.

**१६.६** महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, या व्हिजन ग्रुपमार्फत इनोव्हेशन पार्क स्थापन करण्यासबंधित सर्वंकष विचार करुन प्रस्तावित इनोव्हेशन पार्कसाठी उपयुक्त अशी जमीन शोधणे, संकल्प योजना तयार करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, तांत्रिक-व्यवहारिक सुसाध्यता पडताळणी करणे, संभवनीय भागिदारांसोबत विचारविनिमय करणे, संयुक्त व्यावसायिक भागिदार शोधणे, संबंधित विभागाशी तसेच केंद्र शासन व आंतरराष्ट्रीय संस्थांबरोबर वाटाघाटी / करार करणे तसेच इनोव्हेशन पार्कच्या उभारणीसंबंधीत आवश्यक ती सर्व कार्यवाही करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी

..२९/-

अशी सूचना केली की, सुमारे ५ हजार एकर परिसर या प्रयोजनासाठी संपादित करण्याऐवजी पहिल्या प्रथम १००० किंवा २००० एकर जमिनीची निवड करावी.

१६.७ वरीलप्रमाणे माहिती सदर करुन महानगर आयुक्त यांनी श्री.राजेंद्र जगदाळे, महासंचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, विज्ञान आणि तंत्रज्ञान पार्क, पुणे यांना सादरीकरण करण्यासाठी विनंती केली. श्री.राजेंद्र जगदाळे यांनी सादरीकरण केले व त्यानंतर महानगर आयुक्त यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव मंजूरीसाठी सादर केला :-

<u>प्रस्ताव</u> :-

१६.८ वर उल्लेखित केल्याप्रमाणे स्थापन करण्यात आलेल्या व्हिजन ग्रुपने सुचविलेली इनोव्हेशन पार्कसाठीची जमीन निश्चित करणे तसेच ती जमीन मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम / महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम / भूसंपादन अधिनियम अंतर्गत संपादीत करण्याची कार्यवाही करणे तसेच संपादीत जमिनीसाठी रेडी रेकनर रेटप्रमाणे जमीन मालकास मोबदला देणे इत्यादी कार्यवाही करणे तसेच जमीन मालकाबरोबर बोलणी अथवा करार करणे हे प्राधिकरणाच्या अंतीम मंजूरीस अधिन राहून मान्यता द्यावी व या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता द्यावी.

१६.९ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला हा प्रकल्प यशस्वीरित्या राबविण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान पार्क, पुणे यांना सल्लागार म्हणून नियुक्त करण्यास प्राधिकरणाने मान्यता द्यावी ही विनंती. तसेच इनोव्हेशन पार्कच्या कार्याची व्याप्ती, तिचा आराखडा तसेच पार्क कार्यान्वित करण्यासाठीचे प्राथमिक कार्याची निश्चिती करणे ही सर्व कामे करण्यासाठी सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांच्याबरोबर करार करण्याचे प्रस्तावित आहे. या संस्थेबरोबर करावयाच्या कराराची कार्यकक्षा तसेच या कामाकरीता द्यावयाचा मोबदला इत्यादींची कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता द्यावी.

१६.१० तसेच फ्रान्सचे अध्यक्ष श्री.निकोलस सारकोझी यांच्या सप्टेंबर, २००९ मधील प्रस्तावित मुंबई भेटीदरम्यान राज्य शासन, प्राधिकरण, फ्रान्स सरकार यांच्यात याविषयी औपचारिक सामंजस्य करार / करार करण्याचे प्रस्तावित आहे. हा करार तयार करण्यासाठी

केंद्र शासन व फ्रान्स सरकार तसेच इतर संस्थांबरोबर पत्रव्यवहार करणे तसेच हा सामंजस्य करार प्राधिकरणाच्या अंतिम मंजूरीस अधिन राहून करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता द्यावी.

**१६.११** तसेच इनोव्हेशन पार्कच्या कार्याची व्याप्ती, तिचा आराखडा तसेच पार्क कार्यान्वित करण्यासाठीचे प्राथमिक कार्याची निश्चिती करणे ही सर्व कामे करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान पार्क, पुणे यांची नेमणूक करण्यास तसेच त्यांच्या कामाची कार्यकक्षा तसेच या कामाकरीता द्यावयाचा मोबदला ठरविणे इत्यादींची कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास मान्यता द्यावी.

**१६.१२** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२१६ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा व त्याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे व्हिजन ग्रुपने सुचविलेली इनोव्हेशन पार्कसाठीची जमीन निश्चित करणे तसेच ती जमीन मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम/महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर नियोजन अधिनियम/भूसंपादन अधिनियम अंतर्गत संपादीत करण्याची कार्यवाही करणे तसेच संपादीत जमिनीसाठी रेडी रेकनर रेटप्रमाणे जमीन मालकास मोबदला देणे इत्यादी कार्यवाही करणे तसेच जमीन मालकाबरोबर बोलणी अथवा करार करणे हे प्राधिकरणाच्या अंतिम मंजूरीस अधिन राहून करण्यास हे प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरण, राज्य शासन व फ्रान्स सरकार यांच्यात सामंजस्य करार करण्यास तसेच संबंधित विभागाशी पत्रव्यवहार प्राधिकरणाच्या अंतिम मंजूरीस अधिन राहून करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** इनोव्हेशन पार्कच्या कार्याची व्याप्ती, तिचा आराखडा तसेच पार्क कार्यान्वित करण्यासाठीचे प्राथमिक कार्याची निश्चिती करणे ही सर्व कामे करण्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान पार्क, पुणे यांची नेमणूक करण्यास तसेच त्यांच्या कामाची कार्यकक्षा तसेच या कामाकरीता द्यावयाचा मोबदला ठरविणे इत्यादींची कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

"**आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** बाब टिप्पणीतील इतर बाबी व वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यासाठी प्राधिकरण याद्वारे महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करीत आहे."

**बाब क्र.१७ : मुंबई महानगर प्रदेशामध्ये भाडेतत्वावरील परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्याचा महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पाकरीता प्राधिकरणामध्ये "रेन्टल हाऊसिंग डिव्हिजन" निर्माण करणेस मान्यता देणेबाबत.**

**१७.१** महानगर आयुक्त यांनी या प्रस्तावाबद्दल माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वांगीण विकास होत असतानाच नोकरी व व्यवसायासाठी या प्रदेशामध्ये येणा-यांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. या प्रदेशाची वाढती लोकसंख्या व उपलब्ध घरकुले यांच्यात प्रचंड तफावत आहेत. याच पार्श्वभूमीवर प्राधिकरणाने देशात प्रथमच गरिबांना परवडणारी अशी कमीतकमी १६० चौ.फूट क्षेत्रफळाची भाडेतत्वावरील घरे उपलब्ध करुन देण्याची योजना तयार करण्यात आलेली आहे. या योजनेंतर्गत मुंबई महानगर प्रदेशामध्ये पुढील ५ वर्षात ५ लाख भाडेतत्वावरील परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्याचा प्राधिकरणाचा प्रयत्न आहे. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी आपल्या दिनांक १७.७.२००९ रोजीच्या पत्राद्वारे प्राधिकरणामार्फत प्रस्तावित असलेल्या रेन्टल हाऊसिंग प्रकल्प प्राधिकरणास राबविणे शक्य व्हावे यासाठी शासनाने विकास नियंत्रण नियमावलीत आवश्यक तेथे सुधारणा केली असून सदर प्रकल्प राबविण्यासाठी प्राधिकरणाने स्वतंत्र रेन्टल हाऊसिंग डिव्हिजन स्थापन करुन त्यावर प्रमुख नगर नियोजक व इतर कर्मचा-यांची पदे निर्माण करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी असे कळविले आहे.

१७.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, ऑगस्ट, २००८ पासून सुमारे मागील १० महिन्यांमध्ये प्राधिकरणाकडे भाडेतत्वावरील घरांच्या योजना राबविण्यासंदर्भात एकूण ४५ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ११ प्रस्तावांना लोकेशनल क्लिअरन्स (Locational Clearance) देण्यात आलेले आहेत व संबंधित महानगरपालिकांना तसेच स्थानिक संस्थांना बांधकाम परवाना देणे इत्यादींसाठी विनंती करण्यात आलेली आहे.

१७.३ उर्वरीत प्रस्तावांची छाननी सुरु असून त्यापैकी काही प्रस्ताव नगर विकास विभाग महाराष्ट्र शासन यांच्याकडे स्पष्टतेसाठी पाठविण्यात आले आहे. लोकेशनल क्लिअरन्स (Locational Clearance) देण्यात आलेल्या प्रस्तावांतर्गत अंदाजे १.६७ लक्ष भाडेतत्वावरील घरे प्राधिकरणास मोफत हस्तांतरीत होतील व या प्रस्तावांतर्गत विकास नियम नियंत्रण नियमावलीनुसार अनुज्ञेय क्षेत्रापेक्षा अतिरिक्त बांधकाम क्षेत्रावर विकासकाकडून देय असलेल्या पायाभूत सुविधा विकास शुल्कातून (Infrastructure Charge) प्राधिकरणास अंदाजित रु.५६५ कोटी प्राप्त होतील. या शुल्कातून महानगरपालिका, नगरपालिका, प्राधिकरण या प्रकल्पासाठी पायाभूत सुविधा पुरवेल अशी शासन निर्णयामध्ये तरतूद आहे.

१७.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर भाडेतत्वावरील घरे योजनेचा पहिला महत्वाकांक्षी टप्पा हा ५ लाख घरे उपलब्ध करण्याचा असून तो ५ वर्षात पूर्ण झाल्यास प्राधिकरणास ५ लाख भाडेतत्वावरील घरे मोफत हस्तांतरीत होतील ज्यांचे बाजार मूल्य अंदाजे रु.२० हजार कोटी असेल आणि प्रत्येक वर्षी साधारणातः रु.७५० कोटी उत्पन्न भाडयापोटी मिळेल अशी अपेक्षा आहे. तसेच या ५ लाख भाडेतत्वावरील घरे योजनेंतर्गत अंदाजे रु.१६०० कोटी पायाभूत सुविधा शुल्कापोटी प्राप्त होऊ शकेल व त्यातून १०% रक्कम प्राधिकरणास आस्थापना खर्चाच्या प्रतिपूर्तीसाठी प्राप्त होईल.

१७.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, सदर भाडेतत्वावरील घरांच्या योजनेची अंमलबजावणी प्राधिकरणाच्या आस्थापनेवर असलेल्या सह-प्रकल्प संचालक (नगर नियोजन) या कायमस्वरुपी पदामार्फत आतापर्यंत केली जात आहे व त्यांच्याजवळ जेमतेम २ कर्मचारी असून अधिकरी व कर्मचारी वाढविण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव आहे. या महत्वाकांक्षी योजनेंतर्गत प्राप्त होणा-या प्रस्तावाची छाननी लवकरात लवकर करुन या योजनेला मुर्तस्वरुप देण्यासाठी एक

खिडकी योजनेंतर्गत चालना देण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी कायमस्वरुपी पदे निर्माण करुन स्वतंत्र "रेन्टल हाऊसिंग डिव्हिजन" स्थापन करणे आवश्यक आहे. कंत्राट पध्दतीने पदे भरावयाची झाल्यास सुयोग्य प्रकारचे अधिकारी / कर्मचारी उपलब्ध होत नाहीत तसेच उपलब्ध झाल्यास जास्त काळ टिकून रहात नाहीत तसेच सध्या प्राधिकरणाने हाती घेतलेल्या कामांचा व्याप बघता इतर विभागातील कर्मचारी या योजनेसाठी उपलब्ध नाहीत. म्हणून या योजनेसाठी प्राधिकरणामध्ये स्वतंत्र डिव्हिजन निर्माण करण्याची गरज आहे.

**महानगर आयुक्त यांनी वरील बाबी सांगून खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला :-**

**१७.६** "रेन्टल हाऊसिंग डिव्हिजन" मध्ये खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे नवीन पदे निर्माण करण्याचे प्रस्तावित आहे. सदर रेन्टल हाऊसिंग डिव्हिजनसाठी आवश्यकतेनुसार प्रशासकीय कर्मचारी व इतर सहायक कर्मचारी प्राधिकरणाच्या आस्थापनेवरुन घेण्याचे प्रस्तावित आहे. अशाप्रकारे कायमस्वरुपी पदे निर्माण केल्यामुळे प्राधिकरणावर दरवर्षी सुमारे रु.५० लाख इतका अतिरिक्त वित्तीय भार पडणार आहे. परंतु भाडेतत्वावरील घरांच्या योजनेअंतर्गत प्राधिकरणाकडे जमा होणा-या शुल्काचा विचार करता हा खर्च नगण्य आहे. वरील बाबी लक्षात घेता खालीलप्रमाणे "रेन्टल हाऊसिंग डिव्हिजन" निर्माण करण्यास कृपया मान्यता द्यावी. रेन्टल हाऊसिंग डिव्हिजनमधील नवनिर्मित पदांसाठी सेवाप्रवेश नियम अंतिम करुन त्याप्रमाणे पदे भरण्याची कार्यवाही करण्यास तसेच प्राधिकरणातील इतर अधिकारी / कर्मचा-यांचे रेन्टल हाऊसिंग डिव्हिजनमध्ये आवश्यकतेनुसार समाविष्ट करण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यासही मान्यता द्यावी.

**रेन्टल हाऊसिंग डिव्हिजनमधील प्रस्तावित कायमस्वरुपी नवनिर्मित पदे**

| अ. क्र. | पद | पदांची संख्या | ५व्या वेतन आयोगाप्रमाणे (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | प्रमुख, नगर नियोजक, रेन्टल हाऊसिंग डिव्हिजन | १ | १६,४००-२०,००० | नवीन पद निर्माण |
| २. | वरिष्ठ नगर नियोजक | २ | १२,०००-१६,५०० | नवीन पद निर्माण |
| ३. | नगर नियोजक | ४ | १०,६५०-१५,८५० | नवीन पद निर्माण |
| ४. | उप-नगर नियोजक | ८ | ८,०००-१३,५०० | नवीन पद निर्माण |
| | **एकूण नवनिर्मित पदे** | १५ | | |

**१७.७** मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी या प्रस्तावाबाबत श्री.सिताराम कुंटे, सचिव, गृहनिर्माण विभाग यांचे मत विचारले. श्री.कुंटे यांनी प्राधिकरणाच्या या प्रस्तावास व उल्लेखित

पदे भरण्यास हरकत नाही असे सांगितले. प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी ही शासनाची योजना लोकोपयोगी असून त्यासाठी प्राधिकरणामध्ये प्रस्तावित रेन्टल हाऊसिंग डिव्हिजन स्थापन करुन सर्व पदे भरण्यासाठी मान्यता दर्शविली. वर उल्लेखित चर्चेनुसार वरील प्रस्तावास मान्यता दिली.

१७.८ त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२१७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ११ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा व त्याबाबत सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवर नवीन स्वतंत्र "रेन्टल हाऊसिंग डिव्हिजन" स्थापन करण्यास मान्यता देत आहे. तसेच सदर डिव्हिजनमध्ये खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे कायमस्वरुपी तत्वावर नवीन पदे निर्माण करण्यासही मान्यता देत आहे :-

**रेन्टल हाऊसिंग डिव्हिजनमधील मान्य झालेली कायमस्वरुपी नवनिर्मित पदे**

| अ. क्र. | पद | पदांची संख्या | ५व्या वेतन आयोगाप्रमाणे (रु.) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | प्रमुख, नगर नियोजक, रेन्टल हाऊसिंग डिव्हिजन | १ | १६,४००-२०,००० | नवीन पद निर्माण |
| २. | वरिष्ठ नगर नियोजक | २ | १२,०००-१६,५०० | नवीन पद निर्माण |
| ३. | नगर नियोजक | ४ | १०,६५०-१५,८५० | नवीन पद निर्माण |
| ४. | उप-नगर नियोजक | ८ | ८,०००-१३,५०० | नवीन पद निर्माण |
| | **एकूण नवनिर्मित पदे** | १५ | | |

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वर उल्लेखित तक्त्यामधील "रेन्टल हाऊसिंग डिव्हिजनमधील" नवनिर्मित पदांचे सेवाप्रवेश नियम अंतिम करण्यास व त्या अनुषंगाने पदे भरण्यास महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१८ : महाराष्ट्र शासन आणि फेडरल ट्रान्झिट ॲडमिनिस्ट्रेशन (FTA) यांच्यामध्ये २००८ मध्ये झालेला सामंजस्य करार - मुंबईत सार्वजनिक जलद परिवहन सेवेसंबंधी राष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण संस्था स्थापन करणे व संस्थेसाठी नविन इमारतीचे बांधकाम करणे.**

**१८.१** या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, दिनांक २९ सप्टेंबर, २००८ रोजी फेडरल ट्रान्झिट ॲडमिनीस्ट्रेशन (FTA) चे प्रशासक श्री.जेम्स सिम्प्सन यांच्यासह एका समुह गटाने मुंबईला भेट दिली. त्यात त्यांनी मा.मुख्यमंत्री यांचेबरोबर नागरी वाहतुकीमधील तांत्रिक सहकार्य व संशोधनामधील विकासासंबंधीच्या माहितीची देवाणघेवाण वाढविण्यासंबंधीच्या सहकार्य करारावर (Memorandom of Co-operation) स्वाक्षरी केली.

**१८.२** महानगर आयुक्त यांनी असे सुध्दा सांगितले की, फेडरल ट्रान्झिट ॲडमिनीस्ट्रेशन (FTA) आपणास सर्व मदत करण्यास तयार असून ते या सेवेबाबत कोणतेही शुल्क आकारणार नाहीत. त्यांनी प्रस्तावाबाबत असेही सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत FTA च्या सहकार्याने जागतिक स्तरावर एक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेची वांदे-कुर्ला संकुल येथे स्थापना करणे, सदर संस्था स्थापन करण्याकरीता FTA बरोबर काम करण्याकरिता तसेच महाराष्ट्र शासनाने FTA बरोबर केलेल्या सामंजस्य करार तसेच Co-operative Project Arrangement नुसार Areas of commom interest वर कार्यवाही करणे इत्यादींचा प्राधिकरणाच्या मंजूरीसाठी प्रस्ताव आहे.

**१८.३** वांद्रे-कुर्ला संकुलातील 'ई' ब्लॉकमधील भूखंड क्र.आर-१३ वर राष्ट्रीय संशोधन व प्रशिक्षण संस्थेसाठी सुमारे २१००.०० चौ.मीटर क्षेत्रफळाची अत्याधुनिक व सर्व सुविधायुक्त इमारतीच्या बांधकामासाठी अंदाजीत रु.१०.९० कोटी खर्चास मान्यता देण्यात यावी व त्या अनुषंगाने प्राधिकरणाने यापूर्वी दिनांक २४.१२.२००७ (१२०व्या) रोजीच्या बैठकीत मंजूर केलेल्या कार्यवृत्तात नमूद केल्याप्रमाणे निवासी बांधकामासाठी मंजूर करण्यात आलेल्या भूखंड क्र.आर-१३, आर-१४ व आर-१५ या मंजूर भूखंडातून भूखंड क्र.आर-१३ हा प्रशिक्षण केंद्राच्या बांधकामासाठी वगळण्याची मंजूरी देण्यात यावी. तसेच या भूखंडाच्या (आर-१३) वापरामध्ये बदल करावयाचा झाल्यास त्यासाठी योग्य तो प्रस्ताव सक्षम प्राधिकरणाकडे सादर करावयाची अनुमती देण्यात यावी. तसेच या बांधकामासाठी लागणा-या वास्तूरचनाकार (Architect)

..३६/-

संरचना अभिकल्पक (Structural Designer) व प्रकल्प समंत्रक (Project Management Consultant) यांची स्वतंत्रपणे नेमणूक करण्यास मान्यता देण्यात यावी.

**१८.४** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

<u>ठराव क्र.१२१८ :</u>

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोटकलम (अ), (ब), (क) व (ड) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अमेरिकी प्रशासनाच्या फेडरल ट्रान्झिट ॲडमिनिस्ट्रेशन (FTA) च्या सहकार्याने जागतिक स्तरावर एक राष्ट्रीय संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेची 'ई' ब्लॉक, वांद्रे-कुर्ला संकुल येथे स्थापना करण्यास, सदर संस्था स्थापन करण्याकरीता FTA बरोबर पुढील कार्यवाही करण्यास व महाराष्ट्र शासनाने FTA बरोबर केलेल्या सामंजस्य करारावर (Co-operative Project Arrangement) पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्राधिकरणाच्या दिनांक २४.१२.२००७ रोजीच्या १२०व्या बैठकीत प्राधिकरणासाठी बांधावयाच्या निवासी इमारतीसाठी मंजूर भूखंड क्र.आर-१३, आर-१४ व आर-१५ बाबत मंजूर कार्यवृत्तात बदल करुन त्याऐवजी निवासी इमारतीसाठी आर-१४ व आर-१५ हे भूखंड कायम ठेवून भूखंड क्र.आर-१३ हा वगळण्याबाबतच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे व भूखंड क्र.आर-१३ च्या वापरात बदल करावा लागल्यास त्याबाबतची योग्य ती कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** संस्थेच्या (Institution) बांधकामासाठी वांद्रे-कुर्ला संकुलातील 'ई' ब्लॉकमधील भूखंड क्र.आर-१३ (R-13) या अंदाजे १३८०.०० चौ.मीटर भूखंडावर २१०० चौ.मी. बांधकाम करण्यास व बांधकामासाठी अंदाजित रु.१०.९० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे व बांधकामाच्या अनुषंगाने

वास्तुरचनाकार (Architect), संरचना अभिकल्पक (Structural Designer) व प्रकल्प समंत्रक (Project Management Consultant) यांची स्वतंत्रपणे नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर प्रकल्प करारानुसार वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी व बांधकामातील तरतूदी अंतिम करणे, निविदा मागविणे, गरज असल्यास भूखंड नावावर करणे व आवश्यक ते बदल करणे, वास्तूरचना, संरचना, प्रकल्प समन्वयक यांच्या नेमणूका करणे याबाबत आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१९ : वांद्रे-कुर्ला संकुलातील चटई क्षेत्र निर्देशांकात बाढ झाल्यानंतर लागणा-या पायाभूत सुविधांबाबत वाहतूक परिणाम मूल्यांकन अभ्यासात केलेल्या शिफारशींना मान्यता मिळण्याबाबत.**

**१९.१** महानगर आयुक्त यांनी थोडक्यात माहिती देताना असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाने प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे उक्त अधिनियम) च्या कलम ४० (१) (सी) अन्वये त्यास प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन आपल्या नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दिनांक ७ मार्च, १९७७ च्या अधिसूचना क्र.बीकेआर-११७७/२६२-युडी-५ द्वारा वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी (यापुढे वांद्रे-कुर्ला संकुल) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची (यापुढे प्राधिकरण) नेमणूक केलेली आहे. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, सविस्तर योजना दिलेल्या आहेत. त्यांनी बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.४ बाबतसुध्दा थोडक्यात माहिती देताना असे सांगितले की, वांद्रे-कुर्ला संकुलात एकूण अनुज्ञेय बांधकाम क्षेत्रापैकी ३,०५,९९२.५३ चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्र वाटप करण्यासाठी शिल्लक आहे.

**१९.२** महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र-६ बाबत माहिती देताना असे सांगितले की, या अभ्यासामध्ये चटईक्षेत्र निर्देशांकात वाढ झाल्यामुळे तसेच परिसरात झालेल्या/होणा-या विकास तसेच रोजगारात होणारी वाढ, प्रस्तावित मेट्रो छन्नमार्ग, मोनोरेल आणि इतर पायाभूत सुविधा विचारात घेतल्या आहेत.

**१९.३** वाहतूक परिणाम मुल्यांकन (TIA) अभ्यासानुसार चटई क्षेत्र निर्देशांकात वाढ झाल्यामुळे वांद्रे-कुर्ला संकुलातील रस्ते व वाहतूक पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याची गरज असून या अभ्यासाच्या शिफारशींना मान्यता देण्याचा प्रस्ताव आहे. त्या अंतर्गत सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचे रुंदीकरण व प्रस्तावित रस्त्यांचे बांधकाम वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) क्षेत्रातील येणा-या रस्त्यांचे अंतर्गत अभिन्यास रस्ते (Internal Layout Road) म्हणून विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच वाहतूक परिणाम मुल्यांकन (TIA) अभ्यासानुसार प्रस्तावित केलेले काही रस्ते वांद्रे-कुर्ला संकुल परिसराला जोडणारे मुख्य रस्ते आहेत जे बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत येतात. त्या अनुषंगाने, विकास आराखडयात आवश्यक ते बदल करुन प्रस्तावित रस्त्यांचा विकास करण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेला शिफारस करण्याचा प्रस्ताव आहे.

**१९.४** महापालिका आयुक्त डॉ.ज.मो.फाटक यांनी असे सांगितले की, या रस्त्याला लागून मुंबई विद्यापीठाची जमीन आहे. त्यांना सुध्दा याबाबत कळवावे लागणार आहे.

**१९.५** प्राधिकरणाचे सदस्य, श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी सांगितले की, या प्रस्तावात केलेल्या शिफारशींची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्यावर महानगर आयुक्तांनी सहमती दर्शविली.

**१९.६** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२१९ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** हे प्राधिकरण महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(सी) अन्वये वांद्रे-कुर्ला अधिसूचित क्षेत्रासाठी नियुक्त विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ३ चे उपकलम (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा व याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील वाहतूक परिणाम मुल्यांकन (TIA) अभ्यासातील शिफारशींना मान्यता देत

..३९/-

आहे. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या रस्त्यांचे रुंदीकरण व प्रस्तावित रस्त्यांचे बांधकाम वांद्रे-कुर्ला संकुल विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) क्षेत्रातील येणाऱ्या रस्त्यांचे अंतर्गत अभिन्यास रस्ते (Internal Layout Roads) म्हणून विकसित करण्यासाठी प्राधिकरण याद्वारे मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रस्तावित केलेले काही रस्ते वांद्रे-कुर्ला संकुलाला जोडणारे मुख्य रस्ते असून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीत येतात अशा रस्त्यांना विकास आराखडयात आवश्यक ते बदल करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विकास करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२० : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत वडाळा येथे प्रस्तावित आंतरराज्य बस वाहनतळ (ISBT) व उत्तुंग इमारत (Iconic Building) या प्रकल्पाबाबतचा अहवाल.**

२०.१ महानगर आयुक्त यांनी थोडक्यात माहिती देताना असे सांगितले की, महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ३ डिसेंबर, २००५ रोजीच्या अधिसूचनेन्वये वडाळा भारवाहकतळ (WTT), आंतरराज्य बस वाहनतळ (ISBT), अनुषंगिक सोयीसुविधा आणि पायाभूत सुविधा, वडाळा येथील अधिसूचित क्षेत्राच्या विकासासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम (M.R.&T.P. Act), १९६६ च्या कलम ४० (१) (सी) मधील तरतुदीनुसार "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नेमणूक केली आहे.

२०.२ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.३ बाबत अशी माहिती दिली की, मुंबई शहराला भूषणावह आणि जागतिक स्तरावरील सर्वोच्च १० इमारतींमध्ये गणली जाईल अशी इमारत वडाळा येथे बांधण्याची संकल्पना करण्यात आली. त्यानुसार आंतरराज्य बस वाहनतळ व वाणिज्य वापर यासाठीचे राखीव ठेवलेले दोन्ही भूखंड एकीकृत करुन त्यात आंतरराज्य बस वाहनतळ व उत्तुंग इमारत उभारण्याच्या प्रस्तावास प्राधिकरणाच्या १२४व्या

बैठकीत सन २००९-१० वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात मान्यता देण्यात आली. सदर दोन्ही भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ सुमारे १,४०,००० चौ.मी. असून ४ चटई क्षेत्र निर्देशांकाप्रमाणे ५,६०,००० चौ.मी. बांधकाम करता येणार आहे. सदर भूखंडावर सुमारे ५३० मीटर उंच अशी १०१ मजली इमारत डिझाईन, बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (DBOOT) तत्वावर बांधण्याचा प्राधिकरणाचा प्रस्ताव आहे.

**२०.३** या कामासाठी सल्लागार संस्था व विकासक (Developer) यांची नेमणूक करणेसाठी जागतिक स्तरावर निविदा दिनांक २० मे, २००९ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यासाठी चांगला प्रतिसाद मिळाला असून २३ सल्लागार संस्थांनी व २० विकासकांनी निविदा विकत घेतल्या आहेत. सल्लागार संस्था नियुक्तीची प्रक्रिया दिनांक २१ ऑगस्ट २००९ पर्यंत पूर्ण होणे प्रस्तावित आहे. तर विकासकांसाठी पूर्व-अर्हता प्रक्रिया दिनांक १४ ऑगस्ट पर्यंत, तांत्रिक छाननी दिनांक ३० नोव्हेंबर २००९ पर्यंत, आर्थिक प्रस्तावाची छाननी दिनांक १५ मार्च २०१० पर्यंत व विकासकाची अंतिम निवड व कार्यादेश दिनांक ३१ मार्च, २०१० पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. सन २०१० हे महाराष्ट्र राज्य निर्मितीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष असल्याने याप्रकल्पाच्या कामाची प्रत्यक्ष सुरुवात दि. १ मे, २०१० रोजी करुन आंतरराज्य बस वाहनतळाचे (ISBT) काम एप्रिल २०१३ तर उत्तुंग इमारतीचे (Iconic Building) काम एप्रिल २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

**२०.४** त्यानंतर, प्राधिकरणाने याबाबतची नोंद घेतली.

**<u>बाब क्र.२१ :</u>** **<u>चारकोप-वांद्रे-मानखुर्द मेट्रो मार्ग-२ हा प्रकल्प, सार्वजनिक खाजगी सहभागाने (PPP)"मे रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, SNC Lavalin Inc. (Canada) आणि मे.रिलायन्स कम्युनिकेशन लिमिटेड (भारत, मुंबई) समुह - मे.रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या पुढाकाराने" प्राप्त झालेली निविदेस कार्यकारी समितीने २२८ व्या बैठकीत मान्यता दिलेली आहे. माहितीसाठी व मान्यतेसाठी सादर.</u>**

**२१.१** महानगर आयुक्त यांनी या टिप्पणीबाबत माहिती देताना असे सांगितले की, मुंबई मेट्रो व्यवस्थेकरीता एक बृहत आराखडा तयार करण्यासाठी तसेच प्राधान्यक्रम असलेल्या मार्गांचा सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यासाठी प्राधिकरणाने मे, २००३ मध्ये दिल्ली मेट्रो

रेल महामंडळाची (DMRC) नेमणूक केली. सदर बृहत आराखडा तयार करताना दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने मेसर्स टाटा कन्सल्टींग सर्व्हीसेस आणि भारतीय तांत्रिक संस्था (आय.आय.टी), मुंबई यांच्या मदतीने सद्याची वाहतूक व्यवस्था तसेच पुढील २० वर्षांकरीता मुंबई महानगर प्रदेशाचा नियोजन आराखडा (मुंबई महानगर प्रदेश प्रादेशिक आराखडा सन १९९६-२०११) अनुसार परिवहनाच्या वाढत्या मागणीचा अभ्यास करुन एक बृहत आराखडा तयार केला. त्या बृहत आराखडयामध्ये ९ छन्नमार्गांचा समावेश असून त्यांची एकूण लांबी १४६.५ कि.मी. इतकी आहे. त्यापैकी सुमारे ३२.५ कि.मी. भुयारी व उर्वरित लांबी उन्नत मार्गाने प्रस्तावित आहे. बृहत आराखडयाची अंमलबजावणी सन २००६ पासून २०२१ पर्यंत ३ टप्प्यांमध्ये विकसित करण्याची शिफारस दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने केली आहे. बृहत आराखडयाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे:-

| अ. क्र. | तपशिल | टप्प्यानुसार लांबी (कि.मी) | अंमलबजावणीचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | वर्सोवा - अंधेरी - घाटकोपर | ६३.८ टप्पा - १ | २००६-२०११ |
| २ | कुलाबा - माहिम - चारकोप | | |
| ३ | माहिम - कुर्ला - मानखुर्द | | |
| ४ | चारकोप - दहिसर | १९.९० टप्पा - २ | २०११-२०१६ |
| ५ | घाटकोपर - मुलुंड | | |
| ६ | वांद्रे - कुर्ला संकुल - कांजुरमार्ग मध्य विमानतळ | ६२.८ टप्पा - ३ | २०१६-२०२१ |
| ७ | अंधेरी (पू.) - दहिसर (पू.) | | |
| ८ | हुतात्मा चौक - घाटकोपर | | |
| ९ | शिवडी - प्रभादेवी | | |
| | एकूण | १४६.५ | |

दि. २८ मे, २००४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या ११०व्या बैठकीत सदर बृहत आराखडयाला मान्यता देण्यात आली आहे.

**२१.२** त्यानंतर, महानगर आयुक्तांनी चारकोप-वांद्रे मानखुर्द छन्नमार्ग याची थोडक्यात माहिती दिली ती खालीलप्रमाणे आहे. या प्रकल्पात दिल्ली मेट्रो रेल महामंडळाने सविस्तर प्रकल्प अहवालामध्ये कुलाब्यापासून महालक्ष्मीपर्यंत भुयारी व उर्वरित उन्नत मार्ग सुचविला होता. परंतू मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पासाठी स्टँडर्ड गेजचा वापर करण्यास मंजुरी देताना राज्य शासनाने असा निर्णय घेतला की, कुलाबा-चारकोप छन्नमार्गाचा भुयारी भाग महालक्ष्मीपासून वांद्रेपर्यंत

वाढविण्यात यावा. त्यामुळे प्रकल्प खर्चात सुमारे रु.३००० कोटींची वाढ होईल. या प्रकल्पाच्या खर्चात वाढ झाल्यामुळे सार्वजनिक - खाजगी सहभागाने, बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर या प्रकल्पाची उभारणी करण्यास पुरेसा प्रतिसाद मिळणार नाही. या संबंधात दिल्ली मेट्रो रेल महामंडळाशी चर्चा केली असता असे दिसून आले की, वांद्रे - मानखुर्द छन्नमार्गाचा समावेश करुन चारकोप-वांद्रे-मानखुर्द दरम्यान पूर्णपणे उन्नत असा छन्नमार्ग उभारणे योग्य होईल. या संदर्भात चारकोप - वांद्रे - मानखुर्द उन्नत छन्नमार्गाचा सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल दिल्ली मेट्रो रेल महामंडळामार्फत तयार करण्यात आला. त्यानंतर सार्वजनिक - खाजगी सहभागाने, बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा या तत्त्वावर सुमारे रु.६१९२ कोटी खर्चाचा चारकोप-वांद्रे-मानखुर्द छन्नमार्ग कार्यान्वित करण्यास प्राधिकरणाच्या दिनांक २८ सप्टेंबर, २००६ रोजी झालेल्या ११७ व्या बैठकीत मंजूरी मिळाली. तसेच महाराष्ट्र शासनाने दि. १४ नोव्हेंबर, २००६ रोजी वरील प्रस्तावास मान्यता दिली व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची **प्रकल्प अंमलबजावणी संस्था** (Project Implementing Authority) म्हणून नेमणूक केली. शासन निर्णयानुसार या प्रकल्पासंदर्भात होणारे भूसंपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसाहत, पायाभूत सुविधांचे स्थलांतर, इत्यादी करिता शासनामार्फत करण्यात येणारा खर्च प्राधिकरणाने करावा, असेही निर्देश देण्यात आले आहेत. प्रकल्पाला लागणारा व्यवहार्यता तफावत निधी मिळविण्याकरिता केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालय आर्थिक व्यवहार विभाग (DEA) यांचेकडे विहीत नमुन्यात प्रस्ताव दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ रोजी सादर केला. केंद्र शासनाने स्थापन केलेल्या शक्तीप्रदान संस्था (Empowered Institution) व शक्तीप्रदान समिती (Empowered Committee) ने सदर प्रस्तावाचा विचार करुन दि. ७ फेब्रुवारी, २००७ रोजी खालील अटींच्या अधीन राहून प्रस्तावास मान्यता दिली.

१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नमुना सवलत करारनाम्याला (Model Concession Agreement) अनुसरून मसुदा सवलत करारनामा (Draft Concession Agreement) तयार करणे.

२) निविदा प्रक्रिया शक्तिप्रदान संस्थेच्या (Empowered Institution) मार्गदर्शनाखाली राबविणे.

३) विविध तंत्रज्ञानाचे पर्याय पडताळून तसेच सल्लागारानी शिफारस केलेल्या एकूण प्रकल्प खर्चाला मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अंतिम स्वरुप देणे.

..४३/-

**२१.३** त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.५.४ बद्दल अशी माहिती सांगितली की, केंद्र शासनाच्या शक्तीप्रदान संस्थेच्या दिनांक ५ ऑगस्ट, २००८ रोजी झालेल्या १५व्या बैठकीत तसेच दिनांक २५ ऑगस्ट, २००८ रोजी शक्तीप्रदान समितीच्या झालेल्या ४थ्या बैठकीत वरील प्रस्तावाचा विचार करुन रु. ७६६० कोटी खर्चाच्या प्रकल्पास मंजूरी दिली. तसेच रु.१५३२ कोटी व्यवहार्यता तफावत निधी (प्रकल्प खर्चाच्या २०% व्यवहार्यता तफावत निधी) तत्वतः मंजूर करण्यास वित्तमंत्री यांना शिफारस केली. केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार विभागाने रु.१५३२ कोटीच्या व्यवहार्यता तफावत निधीस वित्त मंत्र्यांची मान्यता दिनांक ३ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र शासनास कळविली आहे.

**२१.४** बाब टिप्पणीच्या परिच्छेद क्र.६.१ हा आर्थिक निविदेशी निगडीत असल्यामुळे त्याची सुध्दा संक्षिप्त माहिती महानगर आयुक्त यांनी सांगितली. अर्हताप्राप्त झालेल्या ७ निविदाकारांकडून निविदा मागविण्याची अंतिम तारीख ३० जानेवारी, २००९ अशी ठरविण्यात आली. परंतु निविदाकारांनी, निविदा पूर्व बैठकीत सवलत करारनाम्यात अनेक सुधारणा सुचविल्या. निविदाकारांनी सुचविलेल्या सगळया सूचनांचे प्रस्ताव प्राधिकरणाने केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार विभागास वारंवार कळविले आहेत. या संदर्भात केंद्र शासनाच्या शक्तीप्रदान समितीची सदर सूचनांविषयी अंतिम निर्णय घेण्यासाठी दिनांक २० व २१ जानेवारी, २००९ रोजी बैठक झाली. केंद्र शासनाच्या शक्तीप्रदान समितीने काही सूचना मान्य केल्या तसेच नियोजन आयोगाचे प्रतिनिधी यांनी आग्रह धरलेल्या काही अटी मान्य करुन सुधारित सवलत करारनाम्यास मान्यता दिली. याबद्दल मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ जानेवारी, २००९ रोजी एक बैठक घेण्यात आली आणि त्या बैठकीत सदर करारनाम्यास मान्यता मिळाली. तसेच चारकोप-वांद्रे-मानखुर्द या प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून होत असल्याने आणि सदर सवलत करारनाम्यातील तरतुदींमुळे राज्य शासनावर येणारा कोणताही संभाव्य आर्थिक बोजा उचलण्याची जबाबदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सोपविण्यात आली आहे.

**२१.५** केंद्र शासनाची लवकरात लवकर मान्यता मिळविण्यासाठी प्रयत्न करीत असताना सुमारे सप्टेंबर-ऑक्टोबर, २००८ पासून जागतिक स्तरावर आर्थिक मंदी सुरु झाली. त्यामुळे निविदाकारांनी अंतिम तारखेत मुदत वाढ देण्यात यावी अशी विनंती केली आणि निविदाकारांच्या

विनंतीनुसार ४ वेळा मुदतवाढ देऊन आर्थिक निविदा सादर करण्याची तारीख ४ मे, २००९ ठरविण्यात आली. परंतु अंतिम तारखेपर्यंत एकाही निविदाकाराने आर्थिक निविदा दाखल न केल्यामुळे आर्थिक निविदा सादर करण्याची तारीख २९ मे, २००९ पर्यंत वाढविण्यात आली. सदर अंतिम तारखेपर्यंत वरील ७ अर्हता प्राप्त निविदाकारांपैकी मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या एकाच निविदाकारांकडून आर्थिक निविदा सादर करण्यात आली असून सदर निविदाकाराने व्यवहार्यता तफावत निधी म्हणून रु.२२९८ कोटीची मागणी केली आहे.

**२१.६** दिनांक २९ मे, २००९ रोजी दिलेल्या व्यवहार्यता तफावत निधीनुसार खालीलप्रमाणे आर्थिक दायित्व केंद्र शासन व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेकडून अपेक्षित आहे :-

| | | |
|---|---|---|
| (१) | एकूण व्यवहार्यता तफावत निधी | रु. २२९८ कोटी |
| (२) | भू-संपादनाचा खर्च | रु. ६६५ कोटी |
| (३) | पायाभूत सुविधा स्थलांतर, पुनर्वसन व पुनर्वसाहत खर्च | रु. ३८२ कोटी |
| (४) | स्वतंत्र अभियंत्याचा खर्च -१%(७६६०)५०% | रु. ३९ कोटी |
| | **एकूण दायित्व** | **रु. ३३८४ कोटी** |

केंद्र शासनाने मान्य केलेला रु. १५३२ कोटी व्यवहार्यता तफावत निधी वगळून प्राधिकरणाचे एकूण दायित्व अंदाजे रु. १८५२ कोटी आहे.

**केंद्र व राज्य शासनाचा कर व शुल्क -**

केंद्र शासनाचा कर व शुल्क अंदाजे एकूण रु. १२३६ कोटी

राज्य शासनाचा अंदाजे कर व शुल्क एकूण रु. २३३ कोटी

वरील सर्व कराची रक्कम व शुल्क एकूण अंदाजित प्रकल्प खर्चात अंतर्भूत असून सदर रक्कम सवलतदाराला भरावी लागेल.

**२१.७** महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, बाब टिप्पणीच्या जोडपत्र-५ मध्ये जोडलेल्या मुल्यमापन समिती अहवालात परिच्छेद ३ मध्ये उपकलम ३.१ पासून ३.१४.१ पर्यंत (पृष्ठ क्र.४ ते १०) ही वित्तीय निविदा वाजवी व रास्त आहे याचे पूर्णपणे स्पष्टीकरण देण्यात आले आहे.

**२१.८** प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत पहिल्या प्रकल्पाबद्दल बोलताना असे सांगितले की, वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर या मार्गाचे भूमीपूजन पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांचे हस्ते जून २००६ ला संपन्न झाले तरी या प्रकल्पाची

व्यवहार्यता तफावत निधी अद्यापपावेतो प्राधिकरणाला प्राप्त झालेली नाही. या विलंबास प्राधिकरणाचा जो अधिकारी जबाबदार आहे, त्याच्यावर काय कार्यवाही केली याबाबतचा तपशिल देण्यात यावा. या संदर्भात महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, केंद्र शासनाकडून या प्रकल्पाची व्यवहार्यता तफावत निधी मिळण्याकरिता सतत पत्रव्यवहार करण्यात आला. एवढेच नव्हे तर या संदर्भात केंद्र शासनाच्या विविध अधिका-यांसमवेत बैठकी आयोजित करण्यात आल्यात. सन २००६ ला केंद्र सरकारकडे व्यवहार्यता तफावत निधी मंजुरीकरिता मार्गदर्शक तत्त्वे नसल्यामुळे मा. पंतप्रधान कार्यालयाने मुंबई शहरातील वाहतुक क्षेत्रामध्ये आमुलाग्र बदल करण्याच्या दृष्टीने दि. २७ जानेवारी, २००९ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये एकूण प्रकल्प खर्चाच्या २०% रक्कम अतिरिक्त केंद्र सहाय्य म्हणून मंजूर करण्याबाबत वित्त व नगर विकास मंत्रालयास सूचना दिलेली आहे. त्यानुसार चालू आर्थिक वर्षात या प्रकल्पाकरिता अर्थसंकल्पीय तरतूद केलेली आहे. त्यामुळे हा निधी लवकरच प्राप्त होईल. या प्रस्तावाबाबत प्राधिकरणाकडून किंवा शासनाकडून कुठेही विलंब झालेला नाही.

२१.९ प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक पुढे म्हणाले की, चारकोप-वांद्रे-मानखुर्द या ३२ कि.मी. लांबीच्या मेट्रो रेल्वे प्रकल्पाकरिता व्यवहार्यता तफावत निधी मंजुरी प्रक्रियेत फेब्रुवारी २००७ ते नोव्हेंबर २००९ पर्यंत विलंब झालेला आहे. त्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढली आणि जागतिक स्तरावर आर्थिक मंदी सुरु झाली आहे. याला जबाबदार कोण आहे? या संदर्भात महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालय आर्थिक व्यवहार विभाग यांना विहीत नमुन्यात दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ रोजी तपशीलवार प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावास शक्तीप्रदान समितीने दिनांक ७ फेब्रुवारी, २००७ रोजी मान्यता दिलेली आहे. केंद्र शासनाकडे नमुना सवलत करारनामा उपलब्ध नसल्यामुळे नगर विकास मंत्रालयाने नियोजन आयोगाकडे नमुना सवलत करारनामा तयार करण्याचे काम सोपविले होते. नियोजन आयोगाने नमुना सवलत करारनामा तयार करण्यासाठी अनेक वेळा बैठकी घेतल्या तरीसुद्धा आतापर्यंत नमुना सवलत करारनाम्यास नियोजन आयोगाकडून अंतिम रुप देण्यात आलेले नाही. सदर मार्गाकरिता मसुदा सवलत करारनामा हा नमुना सवलत करारनाम्यानुसार करावा या नियोजन आयोगाच्या आग्रहामुळे निविदा प्रक्रियेस विलंब झाला. यासंदर्भात नियोजन आयोगाच्या उच्चस्तरीय अधिका-यांनी मा.मुख्य सचिव आणि राज्य शासनाच्या इतर उच्चस्तरीय अधिका-यांबरोबर नमुना सवलत करारनाम्यावर अनेक वेळा चर्चा केलेली आहे. आतापर्यंत नमुना सवलत करारनाम्यास अंतिम रुप देण्यात आले नसले तरी चारकोप-वांद्रे-मानखुर्द या प्रकल्पाच्या मुसदा सवलत करारनाम्यास मंजुरी मिळाली आहे,

ही वस्तुस्थिती आहे. केंद्र शासनाच्या शक्तीप्रदान संस्थेच्या दिनांक ५ ऑगस्ट, २००८ रोजी झालेली बैठक तसेच दिनांक २५ ऑगस्ट, २००८ रोजी शक्तीप्रदान समितीच्या झालेल्या बैठकीत सदर प्रस्तावांचा विचार करुन रु.७६६० कोटी (भूसंपादन, पायाभूत सुविधा स्थलांतर, पुनर्वसन व पुनर्वसाहत तसेच राज्य शासनाचा कर वगळून) खर्चाच्या प्रकल्पास मंजूरी दिली. तसेच रु.१५३२ कोटी व्यवहार्य तफावत निधीला (प्रकल्प खर्चाच्या २०% व्यवहार्य तफावत निधी) मंजुरी देण्यात आली. वरील बाब लक्षात घेता या प्रकल्पाबाबत कुठल्याही प्रकारचा विलंब झालेला नाही, असे स्पष्ट होते.

**२१.१०** प्राधिकरणाचे सदस्य श्री.आशिष शेलार, नगरसेवक यांनी असे सांगितले की, चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मार्गामधील जुहू ते वांद्रेपर्यंत मोठया प्रमाणात जमीन संपादीत करावी लागणार असून हा भाग भुयारी करुन ही तफावत मॉडेल कन्सेशन ॲग्रीमेंटमध्ये आणली पाहिजे. तसेच या प्रकल्पामुळे ब-याच व्यापा-यांच्या जमिनी संपादित करण्यात येणार आहेत. परिणामी अनेक व्यापारी संस्था बाधित होतील. त्यामुळे याकरिता लोकांचा तीव्र विरोध आहे.

**२१.११** महानगर आयुक्त यांनी या बाबीवर स्पष्टीकरण देताना असे सांगितले की, या ३२ किलामीटर रेल्वे मार्गापैकी बहुतांश मार्ग हा रस्त्याच्या मध्यभागावरून जात असल्यामुळे मेट्रो मार्गाकरिता केवळ २ मीटर जमिनीची आवश्यकता आहे. हा मार्ग काही ठिकाणी वळणदार असल्याने काही इमारती बाधित होतील.

**२१.१२** महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, अशी ठिकाणे वगळून इतर कुठेही जमिनी संपादन करण्याचा प्रश्नच निर्माण होणार नाही. याबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, ट्रामवेज अधिसूचना १८८६ नुसार नगर विकास विभाग अंतर्गत मसुदा अधिसूचना दिनांक १ नोव्हेंबर, २००८ रोजी हरकती व सूचनांसाठी प्रसिद्ध केली. त्यानुसार एकूण सुमारे ८५०० हरकती व सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी जवळपास २५० इतक्याच भुयारी मार्गाशी संबंधित आहे. या संदर्भात नागरिकांमध्ये काही गैरसमज निर्माण होऊ नयेत त्या दृष्टीकोनातून प्राधिकरणाद्वारे जाहिर निवेदन प्रसिद्ध करण्यात येईल. महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, भुयारी मार्गाच्या तांत्रिक सुसाध्यता पाहणीकरिता मेसर्स लुईस बर्जर ग्रुप या संस्थेची नेमणूक करण्यात आलेली आहे. या संस्थेकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर या परिसरातील लोकप्रतिनिधी व नागरिकांसोबत चर्चा करण्यात येईल.

**२१.१३** त्यानंतर, बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२२०** :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १२ चे उपकलम (१) चे पोट-कलम (ड), (ई) व (ग) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याद्वारे -

१) "मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड, SNC Lavalin Inc. (Canada) आणि मे. रिलायन्स कम्युनिकेशन लिमिटेड (भारत, मुंबई) समुह" - मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांच्या पुढाकाराने दिनांक २९ मे, २००९ रोजी सादर केलेल्या रु.२२९८ कोटींच्या व्यवहार्यता तफावत निधीस मान्यता देण्यात येत आहे.

२) राज्य शासनाने निर्देश दिल्याप्रमाणे चारकोप-वांद्रे-मानखुर्द या प्रकल्पासाठी लागणारे केंद्र शासनाचे रु.१५३२ कोटी वगळून उर्वरीत अनुदान, भूसंपादन, पायाभूत सुविधांचे स्थलांतर, पुनर्वसन व पुनर्वसाहत, स्वतंत्र अभियंत्याचा खर्च (५०%), इत्यादी धरुन अंदाजे रु.१८५२ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

३) राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार चारकोप-वांद्रे-मानखुर्द या प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून होत असल्याने सवलत करारनाम्यातील तरतूदी अन्वये राज्य शासनावर येणारा इतर संभाव्य आर्थिक बोजा उचलण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२२ : मुंबई महानगर प्रदेशामध्ये विरार-अलिबाग मल्टीमॉडेल छन्नमार्ग विकसित करण्यासाठी तांत्रिक-वित्तीय आणि आर्थिक सुसंगतीचा अभ्यास करणे - सद्यस्थिती.**

या बाब टिप्पणीबाबत थोडक्यात महानगर आयुक्तांनी माहिती दिली व असे सांगितले की, ही बाब माहितीसाठी सादर करण्यात आलेली आहे. त्यानंतर, प्राधिकरणाने बाब टिप्पणीतील प्रस्तावाची नोंद घेतली.

**पटल बाब क्र.१ : निर्मल मुंबई महानगर प्रदेश - स्वच्छता अभियान.**

श्री.वसंत डावखरे, उप-सभापती, विधान परिषद यांनी असा आरोप केला की, या अभियानामध्ये फार मोठा भ्रष्टाचार झालेला आहे आणि यामध्ये शासनाचा पैसा गुंतवला असल्यामुळे ही बाब फार गंभीर आहे याबाबत महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, निर्मल अभियानांतर्गत बांधण्यात येत असलेल्या स्वच्छतागृहांच्या बांधकामाची संपूर्ण जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. परंतु जर अशी काही विविक्षित माहिती असेल तर ती द्यावी, त्याबाबत चौकशी करण्यात येईल.

महानगर आयुक्त यांनी या बाब टिप्पणीतील प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती दिली. सदरहू बाब ही प्राधिकरणाच्या माहितीसाठी सादर केली असल्यामुळे प्राधिकरणाने नोंद घेतली.

**पटल बाब क्र.२ : ठाकुर्ली येथील पॉवर प्लान्ट पुनर्जिवित (Revival) करणे.**

मुंबई महानगर प्रदेशात तसेच महाराष्ट्रात सध्या उर्जा निर्मितीच्या परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतर मुंबई महानगर प्रदेशाला एक आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याच्या दृष्टीकोनातून प्राधिकरणाने अतिरिक्त वीज निर्मितीबद्दल पुढाकार घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व सिडको यांच्या संयुक्त सहकार्याने वीज निर्मितीसाठी २००९-२०१० या वर्षात अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात १० कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे.

त्यानुसार प्राधिकरणाने सिडको आणि इतर राज्य शासन तसेच केंद्र शासन यांच्या संबंधित विभागाशी चर्चा करण्यास सुरुवात केली आहे. रेल्वेच्या उच्च अधिका-यांबरोबर चर्चा करीत असताना असे आढळून आले की, कल्याणच्या जवळ ठाकुर्ली या ठिकाणी एक बंद पडलेले थर्मल पॉवर प्लान्ट (Termal Power Plant) आहे. हा प्लान्ट दुरुस्त करण्याकरीता रेल्वे बोर्डाने, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि महाराष्ट्र शासन यांच्या सहभागाने गॅस बेस पॉवर प्लान्ट (Gas based Power Plant) निर्माण करण्याची तयारी दर्शविली आहे. याची क्षमता सुमारे ७०० मेगा वॅट इतकी असेल आणि या प्लान्टच्या उपयोगाचा पर्यावरणातील प्रदुषणावर विपरीत परिणाम होणार नाही. या संदर्भात मा.मुख्यमंत्री यांनी मा.रेल्वेमंत्री यांना पुढील कार्यवाहीसाठी दिनांक २८ जुलै, २००९ रोजीच्या पत्राद्वारे विनंती केली आहे. या प्लान्टला लागणा-या उर्जेचा पुरवठा करण्यासाठी मे.शेल या कंपनीने प्राथमिक स्वरुपात तयारी दर्शविली आहे.

या विषयासंदर्भातील प्रगतीनुसार प्राधिकरणास माहिती देण्यात येईल. तसेच गरज लागल्यास अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक २००९-१० यामध्ये सुधारीत प्रस्तावाकरीता विनंती करण्यात येईल.

सदरहू बाब ही प्राधिकरणाच्या माहितीसाठी सादर केली असल्यामुळे प्राधिकरणाने नोंद घेतली.

**पटल बाब क्र.३ : सन २००९-१० या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पातील पुनर्विनियोजन.**

महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या दिनांक १०.२.२००९ रोजी झालेल्या १२४ व्या बैठकीत रु.६६५३.३७ कोटी खर्चाचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला आहे. दरम्यानच्या काळात काही मंजूर बाबींवरील अंदाजित खर्चात वाढ झाल्याने वा नविन योजना/प्रस्ताव विचाराधीन असल्यामुळे खालीलप्रमाणे बदल झाले आहेत :-

१) **मुंबई महानगर प्रदेशातील बृहन्मुंबई वगळता उर्वरित भागातील शहरे व खेडी यांच्या वाढीव पाणी पुरवठ्यासाठी स्त्रोत विकास कार्यक्रम राबविणे :**

महानगर आयुक्त यांनी याबाबत थोडक्यात माहिती दिली. या योजनांसाठी सन २००९-१० मध्ये रु.१० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. ठाणे जिल्हयातील शाई व अन्य नद्यांवरील धरणांसाठी सदर तरतूद प्रस्तावित करण्यात आली होती. शाई धरणाचा खर्च प्राधिकरणाने करावयाचा असून त्यासंदर्भात शासनाने तशा सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने मुळ तरतूद अपूरी ठरणार असून, सुधारीत तरतूद रु.९० कोटी आवश्यक आहे. अतिरिक्त लागणारी रक्कम रु.८० कोटी पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करावी लागेल.

२) **माथेरान येथील दस्तूरी नाका ते माथेरान यादरम्यान शटल सेवा व पनवेल ते माथेरान यादरम्यान फिनीकल रेल्वे सेवा सुरु करण्यासाठी माथेरान नगर परिषदेला अनुदान देण्याबाबत :**

महानगर आयुक्त यांनी याबाबतसुध्दा थोडक्यात माहिती सांगितली. माथेरान येथील दस्तुरी नाका ते माथेरान यादरम्यान शटल सेवा व पनवेल ते माथेरान यादरम्यान फिनीकल रेल्वे सेवा सुरु करण्यासाठी माथेरान नगर परिषदेला अनुदान देण्यात यावे. या आर्थिक वर्षात रु.१० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात येत असून, पुनर्विनियोजनाद्वारे सदर खर्च भागविता येऊ शकेल.

..५०/-

३) **विविध प्रकारच्या सल्लागार सेवेसाठी करण्यात येणारा खर्च :**

तसेच महानगर आयुक्त यांनी याबाबतसुध्दा माहिती दिली. विविध प्रकारच्या सल्लागार सेवेसाठी करण्यात येणारा खर्च भागविण्यासाठी पुनर्विनियोजनाद्वारे या वित्तीय वर्षात रु.२० कोटी इतकी तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

४) **काशिमिरा-भाईंदर-गोराई-मनोरीतर रस्त्याच्या रु.३४.५० कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे :**

महानगर आयुक्त यांनी याबाबत असे सांगितले की, काशिमिरा-भाईदर-गोराई-मनोरीतर रस्त्याच्या कामात तीन कमकुवत पुलांचे रुंदीकरण व स्थानिक रस्त्यांचा जाळयांचा विकास याकरीता सुधारीत किंमत रु.३४.५० कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात यावी सदरहू रक्कम सुध्दा पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करण्यात येईल.

त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र.१२२१:**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २३(१) नुसार प्रादेशिक स्तरावर जलस्त्रोताचा विकास (रु.८० कोटी), माथेरान येथे अतिरिक्त रेल्वे सुविधा पुरविणे (रु.१० कोटी), सर्वसाधारण स्वरुपांच्या सल्लागार सेवा (रु.२० कोटी), हया तीन योजनांसाठी सन २००९-१० हया आर्थिक वर्षात लागणारा अतिरिक्त निधी रु.११० कोटी इतका पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर निधी मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पात केलेल्या रु.८३० कोटी इतक्या मुळ तरतूदीतून कमी करण्यात येत असून सदर शिर्षांतर्गत अंतिम तरतूद रु.७२०.०० कोटी इतकी करण्यात येत आहे. तसेच काशिमिरा-भाईंदर-गोराई-मनोरीतर रस्त्याच्या रु.३४.५० कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.”

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

***************